cmyk

## संपादकीय

# इंद्रायणी काठी...!

'इंद्रायणी काठी, देवाची आळंदी, लागली समाधी ज्ञानेशाची' हा अभंग रविवारी पुणे जिल्ह्यातील मावळ तालुक्यात वेगळ्याच अर्थाने लागू पडला. मावळ तालुक्यात इंद्रायणी नदीवरील रांजण खळगे पाहण्यासाठी आलेल्या पर्यटकांसाठी रविवारचा दिवस 'घातवार' ठरला. पर्यटकांचे आकर्षण असलेल्या तळेगाव दाभाडे परिसरातील कुंडमळा येथील इंद्रायणी नदीवरील लोखंडी पूल क्षमतेपेक्षा अधिक भारामुळे कोसळून झालेल्या दुर्घटनेत ४ जणांचा मृत्यू झाला असून १८ जण गंभीर जखमी झाले आहेत तर ३८ जणांना वाचवण्यात एनडीआरएफच्या पथकाला यश आले आहे.


दैनिक **राज्य लोकतंत्र**

www.epaper.rajyaloktantra.com **नवी दिशा... नवे विचार.....** email:rajyaloktantra75@gmail.com


## संत तुकाराम महाराजांच्या पालखीचे देहूतून पंढरपूरकडे प्रस्थान

देहू: जगद्गुरु संत तुकाराम महाराजांच्या पालखीचे देहूतून पंढरपूरकडे प्रस्थान झाले आहे. यंदाच्या पालखी सोहळ्याचे ३४० वं वर्ष आहे. देहूनगरीत मानाच्या दिंड्या दाखल झाल्या आहेत. स्वयंभू विठ्ठल रुक्मिणीच्या विधिवत पूजेनंतर पालखी सोहळ्याचे जनक तसेच संत तुकाराम महाराजांचे तृतीय चिरंजीव तपोनिधी नारायण महाराज यांच्या पादुकांचा अभिषेक करून विधिवत पूजा करण्यात आली.


बीड – महाराष्ट्र | वर्ष–५ | अंक–५६ | गुरूवार, दि.१९ जुन २०२५ | RNI No.: MAHMAR/2021/85884 | NO.L SB/BEED/RNP-206/2024-26 | पाने–६ | किंमत ३ रूपये


# निम्मा जून सरला; ८ टक्केच पेरण्या!

## पावसाच्या खंडामुळे शेतकरी चिंतेत; मोठ्या पावसाची गरज

**मुंबई । प्रतिनिधी**

**गेल्या तीन आठवड्यापासून एकाच ठिकाणी रेंगाळलेल्या मान्सूनमुळे सध्या शेतकऱ्यांच्या चिंतेत भर पडली आहे. मराठवाड्यासह विदर्भ आणि पश्चिम महाराष्ट्रात पावसाने दडी मारली आहे. जून महिना निम्मा सरला तरी या भागात पेरण्या खोळंबल्या असल्याचे चित्र आहे. राज्यात आतापर्यंत ८ टक्केच पेरण्या झाल्याने यंदाच्या खरीप हंगाम धोक्यात येण्याची शक्यता आहे.**



तीन आठवडे एकाच ठिकाणी रेंगाळलेल्या मान्सूनचा प्रवास सुरू झाल्यानंतर विदर्भ, मराठवाडा, तसेच उत्तर महाराष्ट्रात पावसाने सर्वत्र हजेरी लावली आहे. परिणामी खरीप पिकांच्या पेरण्यांना वेग आला आहे. आतापर्यंत ११ लाख ७० हजार हेक्टरवर पेरण्या झाल्या आहेत. सरासरी क्षेत्राच्या हे प्रमाण आठ टक्के इतके आहे. सर्वाधिक पेरण्या पुणे विभागात एकूण क्षेत्राच्या २० टक्के झाल्या असून, त्याखालोखाल कोल्हापूर विभागात १५, लातूर व नाशिक विभागात प्रत्येकी १२ टक्के पेरण्या झाल्या आहेत. कोकण विदर्भ, तसेच मराठवाड्याच्या काही भागांत अजूनही पावसाची प्रतीक्षा असल्याने, पेरण्यांना अद्यापही वेग आलेला नाही.

### तीन आठवड्यापासून पाऊस गायब

मराठवाड्यासह विदर्भातील बहुतांश भागात गेल्या तीन आठवड्यापासून पाऊस गायब आहे. त्यामुळे या भागात अजूनही पेरण्या खोळंबल्या आहेत.

### सोयाबीन–घेवड्याचे गणित बिघडणार

बीड, धाराशिव यासह काही जिल्ह्यात सोयाबीन पिकानंतर घेवडा (राजमा) हे पिक घेतले जाते. सोयाबीन जेवढ्या लवकर पेरली जाईल, तेवढ्या लवकर घेवडा पेरणे शक्य होते. घेवडा जर उशिरा पेरला तर उत्पादनात फरक पडत असल्याचे शेतकरी चिंतेत आहेत.

## थोडक्यात...

### मी खासगी कारखान्यांचे समर्थन करत नाही–अजित पवार

मुंबई–उपमुख्यमंत्री अजित पवारांवर विरोधकांनी ते खासगी कारखान्यांचे समर्थन करतात असा आरोप केला होता. यावर बोलताना अजित पवारांनी म्हटले की, 'मी खासगी कारखान्यांचे समर्थन करत नाही, मी सहकाराचे समर्थन करतो. मी सहकाराला बळकटी आणण्याचे काम करतो, असे ते म्हणाले.

### विमान अपघातात वाचलेल्या विश्वास कुमार यांना डिस्चार्ज

अहमदाबाद –विमान अपघातातील एकमेव वाचलेले विश्वास कुमार यांना रुग्णालयातून डिस्चार्ज देण्यात आला आहे. १२ जून रोजी अहमदाबाद विमान अपघातात विमानातील एक वगळता सर्व प्रवाशांचा मृत्यू झाला होते. विमानात एकूण २४२ लोक होते. फक्त विश्वास कुमार बचावले.

### आता भाजप पवित्र झाला का? –एकनाथ खडसे

जळगाव–सुधाकर बडगुजर यांचा आता भाजपात प्रवेश झाला. त्यामुळे भारतीय जनता पार्टी हे पवित्र झाली आहेपण एकनाथ खडसे यांना भाजपमध्ये प्रवेश देताना आक्षेप आहे, म्हणून प्रवेश दिला गेला नाही तेव्हा भाजपा अपवित्र होत होता का? आता बडगुजर यांना प्रवेश दिल्याने भाजप पवित्र झाली का ? असा खोचक सवाल खडसे यांनी विचारला आहे.

### मान्सूनने ४८ तसात ६५ टक्के देश व्यापला

मुंबई–जूनच्या शेवटच्या आठवड्यात पूरपरिस्थितीची शक्यता असून कोकण, मध्य महाराष्ट्राने जूनची सरासरी १६ दिवसांत ओलांडली आहे. घाट माथ्यावर विक्रमी पावसाची नोंद झाली असून कोकणात २३ जूनपर्यंत अतिवृष्टीचा इशारा देण्यात आला आहे. मध्य महाराष्ट्र, विदर्भात मुसळधारेचा अंदाज वर्तवण्यात आला आहे. मान्सूनने ४८ तसात ६५ टक्के देश व्यापला आहे.

### मोदी यांच्याकडून ट्रम्प यांना भारत भेटीचे निमंत्रण

नवी दिल्ली–पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी डोनाल्ड ट्रम्प यांना भारत भेटीचे निमंत्रण दिले आहे. ट्रम्प यांच्याकडून निमंत्रणाचा स्वीकार केला असून लवकरच भारतात येऊ, असे आश्वासन त्यांनी पंतप्रधान मोदींना दिले आहे. तसेच ट्रम्प यांनी देखील पंतप्रधान नरेंद्र मोदी यांना अमेरिका भेटीचे निमंत्रण दिले आहे. दोन्ही नेत्यांमध्ये जवळपास ३५ मिनिट फोनवर चर्चा झाली आहे.

### आषाढी वारीसाठी विशेष रेल्वे गाड्या

पंढरपूर–आषाढी वारीसाठी यंदा मध्य रेल्वेने ८० पेक्षा जास्त विशेष रेल्वे गाड्या चालवण्याची घोषणा केली आहे. सोलापूर मध्य रेल्वे स्थानकाचे वाणिज्य विभागीय व्यवस्थापक योगेश पाटील यांनी ही माहिती दिली.

### हिंदी सक्तीला सरकारच्या सुकाणू समितीचाही विरोध

मुंबई : पहिलीपासून हिंदी भाषा शिकवण्याबाबतच्या निर्णयाला राज्य सरकारने नेमलेल्या सुकाणू समितीच्या सदस्यांनीही विरोध केला आहे. हिंदी भाषा शिकवण्याचा निर्णय घेतांना मत विचारात घेतलंच नसल्याचा सुकाणु समिती सदस्यांचे म्हणणे आहे. नव्या शासन निर्णयाला सुकाणू समितीतील सदस्य आणि ज्येष्ठ शिक्षण तज्ज्ञ रमेश पानसे यांनी विरोध केला आहे.

### स्थानिक स्वराज्य संस्था निवडणुकीसाठी भाजपचा मेगा प्लॅन

मुंबई : स्थानिक स्वराज्य संस्था निवडणुकीसाठी भाजपनं मेगा प्लॅन तयार केला आहे. पुढील काही महिन्यात भाजपमध्ये पक्ष प्रवेशांचा धडाका सुरु होणार आहे. नाशिक, पश्चिम महाराष्ट्र, मराठवाडा आणि कोकणात मविआला मोठं खिंडार पडण्याची शक्यता आहे. मविआतील नाराजांना भाजप गळाला लावणार असल्याची माहिती भाजपच्या वरिष्ठ नेत्यांनी दिली आहे.

### हिंदी भाषेसंदर्भात सरकारचा जीआर जारी

मुंबई: यंदा इयत्ता पहिलीपासून तिसरी भाषा शिकवली जाणार नाही. दोनच भाषा असतील ही शालेय शिक्षणमंत्री दादा भुसे यांनी केलेली घोषणा फसवी ठरवणारा शासन निर्णय शालेय शिक्षण विभागाने मंगळवारी रात्री जारी केला आहे. यानुसार राज्य सरकारने मागच्या दाराने हिंदी सक्ती लागू केल्याची चर्चा सुरु झाली आहे.

# फडणवीसांच्या जवळच ड्रोन पडला

## देहूमधील पालखी सोहळ्या दरम्यानची घटना

**पुणे । प्रतिनिधी**

**मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस देहूमध्ये प्रसारमाध्यमांना प्रतिक्रिया देत असतानाच मुख्य प्रवेशद्वाराजवळ ड्रोन पडण्याची घटना घडली आहे. हा ड्रोन मुख्यमंत्री फडणवीस यांच्यापासून अवघ्या पाच ते दहा फुटांच्या अंतरावर पडला. ही घटना बुधवारी घडली.**



संत तुकाराम महाराज यांच्या ३४० व्या पालखी सोहळ्याला आजपासून सुरुवात झाली आहे. बुधवारी पालखीचे पंढरपूरकडे प्रस्थान झाले आहे. याचदरम्यान मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस देहूमध्ये प्रसारमाध्यमांना प्रतिक्रिया देत असतानाच मुख्य प्रवेशद्वाराजवळ ड्रोन पडण्याची घटना घडली आहे. हा ड्रोन मुख्यमंत्री फडणवीस यांच्यापासून अवघ्या पाच ते दहा फुटांच्या अंतरावर पडला. सुदैवाने या घटनेत कोणालाही दुखापत झालेली नाही. ड्रोन खाली पडल्यानंतर पोलिसांकडून तो जप्त करण्यात आला आहे.

# ठाकरे बंधूंच्या युतीचा आज निर्णय होणार?

## बैठकीत मनसे सोबतच्या युतीला ग्रीन सिग्नल

**मुंबई । प्रतिनिधी**

**ठाकरेंच्या माजी नगरसेवकांनी मनसे सोबतच्या युतीला ग्रीन सिग्नल दिला आहे. त्यानंतर आता उद्धव ठाकरे मनसेसोबतच्या युतीवर दि. १९ जून रोजी आपली भूमिका स्पष्ट करणार आहेत.**

बुधवारी मुंबईमध्ये ठाकरेसेनेच्या माजी नगरसेवकांची उद्धव ठाकरेंच्या सोबत बैठक पार पडली. या बैठकीत उद्धव ठाकरेंनी मनसे युतीबाबत माजी नगरसेवकांना





विचारणा केली. त्यावर या नगरसेवकांकडून ग्रीन सिग्नल मिळाला असल्याची माहिती आता सूत्रांनी दिली आहे. युती केली तर फायदाच आहे. मुंबईत मनसेसोबतच्या युतीला अनुकूल वातावरण आहे, असे मत या बैठकीत माजी नगरसेवकांनी मांडले आहे. युतीसंदर्भात पक्षप्रमुखांनी निर्णय घेण्याचे देखील माजी नगरसेवक म्हणाले आहेत. पक्षप्रमुखांनी घेतलेल्या निर्णयाची अंमलबजावणी करू, असेही माजी नगरसेवकांनी सांगितले आहे. दरम्यान ठाकरे बंधुंच्या युतीचा निर्णय दि. १९ जून रोजी होणार असल्याचे म्हटले जात आहे.

# मल्टिस्टेटच्या दारात ठेवीदाराने घेतला गळफास

## लेकीच्या लग्नासाठी उंबरठे झिझवूनही पैसे न मिळाल्याने उचलले पाऊल




**बीड । प्रतिनिधी**

**लेकीच्या लग्नासाठी मल्टीस्टेटमध्ये अडकलेली ठेव परत न मिळाल्याने गेवराई येथील ४६ वर्षीय वडिलांनी मल्टीस्टेटच्या दारात गळफास घेऊन आत्महत्या केल्याची धक्कादायक घटनासमोर आल्यानंतर बीड मधील मल्टीस्टेटच्या कारभारावर प्रश्नचिन्ह उभे राहिले आहे.**

लेकीच्या लग्नासाठी मल्टीस्टेटमध्ये अडकलेली ठेव वारंवार बँकेच्या फेऱ्या मारूनही परत ◀◀ पान २ वर

### गेल्या दीड वर्षात ११ मल्टिस्टेटने गाशा गुंडाळला

ज्ञानराधा मल्टीस्टेट, साईराम मल्टीस्टेट, मां साहेब जिजाऊ मल्टीस्टेट, राजस्थानी मल्टीस्टेट, मराठवाडा अर्बन माजलगाव मल्टीस्टेट, मातोश्री मल्टीस्टेट, शुभ कल्याण मल्टीस्टेट, परिवर्तन मल्टीस्टेट, छत्रपती मल्टीस्टेट, मंगलनाथ मल्टीस्टेट आणि गंगाभारती मल्टीस्टेट यासह १० मल्टिस्टेने गाशा गुंडाळला आहे. यात जवळपास शेकडो ठेवीदारांच्या साडेपाच हजार कोटी रुपयांच्या ठेवी अडकून पडल्या आहेत.

# रूई पिंपळ्यात कर्जबाजारी युवा शेतकऱ्याची आत्महत्या

## दोन लहान मुलींकडे पाहून तालुक्यात व्यक्त होत आहे हळहळ

वडवणी । प्रतिनिधी

वडवणी तालुक्यातील सोन्ना खोट्टा येथील उर्ध्व कुडलिंका मध्यम प्रकल्पात पहिल्याच टप्प्यात तलावामध्ये गेलेल्या जमिनीचा योग्य मावेजा न मिळाल्याने व संपूर्ण शेती धरणात गेल्यामुळे आणि सततच्या नापिकीमुळ अनेक शेतकऱ्यावर अस्मानी संकट आले आहे.आणि याच संपूर्ण संकटाला कंटाळून रूई पिंपळ्यात दि.१६ रोजी एका कर्जबाजारी युवा शेतकऱ्याने विषारी औषध प्राशन करून आपली जिवनयात्रा संपवली आहे.




बाळासाहेब संतराम भांगे वय ३२ वर्ष असे आत्महत्या केलेल्या शेतकऱ्यांचे नाव असुन या युवा शेतकऱ्यांने शेतात फवारणी करण्यासाठी आणलेले औषध घेतले.त्यांना तात्काळ बीड जिल्हा रूग्णालयात उपचारासाठी दाखल करण्यात आले.उपचारा दरम्यान शेतकरी बाळासाहेब भांगे यांची प्राणज्योत मालवली.बीड जिल्ह्यात वाढती बेरोजगारी,आणि सतत नापिकी व त्यामध्येच उर्ध्व कुंडलिकामध्ये गेलेल्या जमिनीचा देखील मावेजा न मिळाल्याने या युवा शेतकरी बाळासाहेब भांगे यांनी आत्महत्या केली.आत्महत्या केलेल्या त्या शेतकऱ्याच्या लहान मुलींकडे पाहून तालुक्यात हळहळ ◀◀ पान २ वर

# पांडूरंगाची इच्छा असेल तर दादा सीएम होतील

## सुनेत्रा पवार यांचे पुन्हा खळबळजनक वक्तव्य





**पुणे । प्रतिनिधी**

**महाराष्ट्राचे उपमुख्यमंत्री अजित पवार यांना मुख्यमंत्री होण्याची इच्छा आहे, याबद्दल अनेकदा चर्चा झाली आहे. यातच सुनेत्रा पवार यांनी पुन्हा एकदा अजित दादा मुख्यमंत्री होतील, असे म्हटले आहे.**

पांडुरंगाची ◀◀ पान २ वर

# पैठणमध्ये संत एकनाथ महाराज पालखी प्रस्थान सोहळा सुरु

पैठण । प्रतिनिधी

संत एकनाथ महाराजांचा पालखी प्रस्थान सोहळा सुरू झाला आहे. हजारो वारकरी नाथ महाराजांच्या पालखी सोहळ्यात सहभागी झाले आहेत. याठिकाणी देखील वारकऱ्यांच्या उत्साहाला उधाण आलेले आहे.

संत एकनाथ महाराज पालखी सोहळ्याला आजपासून सुरुवात होणार असून, सायंकाळी पैठणहून पालखी पंढरपूरकडे प्रस्थान करणार आहे. यावर्षी प्रथमच संत एकनाथ महाराजांच्या चांदीच्या पादुका १२० किलो चांदीच्या रथात ठेवण्यात येणार आहेत. दुपारी १२ वाजता जुन्या नाथ मंदिरातून चांदीच्या रथात पादुका ठेवून पालखी मिरवणुकीला सुरुवात झाली. सूर्यास्ताच्या वेळी पालखी पंढरपूरकडे प्रस्थान करणार आहे. या रथ निर्मितीसाठी नाथ वंशज रघुनाथ महाराज गोसावी यांच्या संकल्पनेतून भाविकांनी लोकवर्गणी जमा केली आहे. तब्बल १ कोटी २० लाख रुपये खर्चुन हा रथ तयार करण्यात आला ◀◀ पान २ वर

## बाजारभाव

**कृषि उत्पन्न बाजार समिती, बीड, दि.१८ जुन २०२५**

आवक क्विंटलमध्ये तर भाव प्रतिक्विंटलचे आहेत

| पीक (आवक) | किमान | कमाल | सरासरी |
|---|---|---|---|
| गहू: ९०.०० क्विंटल | २,४५० | २,६७७ | २,५५१ |
| ज्वारी/हायब्रिड : ७७.५० क्विंटल | २,०५० | २,७०० | २,४५० |
| मका/लोकल:१०.००क्विंटल | १,७६० | २,८०० | २,२८० |
| तूर : ७.०० क्विंटल | ५,७०० | ६,४०० | ६,१०० |
| उडीद : १.०० क्विंटल | ४,५०० | ४,५०० | ४,५०० |
| बाजरी: २३.५० क्विंटल | २,०४० | २,५६० | २,३१६ |
| मुग :१.०० क्विंटल | ५,००० | ६,२०० | ५,६०० |
| सोयाबीन:४८.५० क्विंटल | ४,२७५ | ४,३११ | ४,२९३ |
| हरभरा: ८.५० क्विंटल | ५,१६५ | ५,४०० | ५,३३२ |

# मुख्यमंत्र्यांच्या वाढदिवसानिमित्त शैक्षणिक उपक्रम

## सामाजिक कार्यकर्ते परमेश्वर येवले यांनी फडणवीसांना भेटून दिली माहिती



**पाटोदा । प्रतिनिधी**

**मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या वाढदिवसानिमित्त सामाजिक कार्यकर्ते व पाटोदा येथील भूमिपुत्र परमेश्वर येवले पाटील यांच्यावतीने शैक्षणिक उपक्रम राबवण्यात येणार आहे. याबाबत मुंबई येथे मंत्रालय कार्यालयामध्ये मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची भेट घेऊन शैक्षणिक उपक्रमाची माहिती दिली. यावेळी मुख्यमंत्र्यांनी येवले पाटील यांचे कौतूककेले.**

शैक्षणिक साहित्या वाटपाची संकल्पना पूर्वीही इतर तालुक्यात राबविण्यात आलेली असून, त्याचा सकारात्मक प्रभाव समाजात दिसून आला आहे. विद्यार्थ्यांना विनामूल्य शालेय सामग्री देणे हे त्यांच्या शिक्षणाला प्रोत्साहन देण्याचा ◀◀ पान २ वर

### १५०० स्कूल बॅग वाटप करणार

मुख्यमंत्र्यांच्या वाढदिवसानिमित्त परमेश्वर येवले यांच्याकडून पाटोदा तालुक्यातील जि.प. शाळा आणि आंगणवाडी येथील सर्व विद्यार्थ्यांना १५००० स्कूल बॅग वाटप करण्यात येणार आहेत. यासाठी पाटोदा येथील शिक्षण अधिकारी यांच्या कार्यालयातून विद्यार्थ्यांची यादी मागवण्यात आलेली आहे. या शैक्षणिक उपक्रमामुळे मुख्यमंत्री यांचे निकटवर्तीय परमेश्वर येवले यांच्यावरती कौतुकाची थाप परिसरातून होत आहे.

cmyk

## अग्रलेख

# इंद्रायणी काठी...!

'इंद्रायणी काठी, देवाची आळंदी, लागली समाधी ज्ञानेशाची' हा अभंग रविवारी पुणे जिल्ह्यातील मावळ तालुक्यात वेगळ्याच अर्थाने लागू पडला. मावळ तालुक्यात इंद्रायणी नदीवरील रांजण खळगे पाहण्यासाठी आलेल्या पर्यटकांसाठी रविवारचा दिवस 'घातवार' ठरला. पर्यटकांचे आकर्षण असलेल्या तळेगाव दाभाडे परिसरातील कुंडमळा येथील इंद्रायणी नदीवरील लोखंडी पूल क्षमतेपेक्षा अधिक भारामुळे कोसळून झालेल्या दुर्घटनेत ४ जणांचा मृत्यू झाला असून १८ जण गंभीर जखमी झाले आहेत तर ३८ जणांना वाचवण्यात एनडीआरएफच्या पथकाला यश आले आहे. या दुर्घटनेत अनेक जण नदीच्या प्रवाहासोबत वाहून गेल्याची भीती असून मृतांचा आकडा वाढण्याची शक्यता आहे. रविवारी दुपारी साडे तीनच्या सुमारास ही दुर्घटना घडली. हा पूल धोकादायक असल्याचा बोर्ड लावण्यात आला होता व तो २ महिन्यांपूर्वीच बंद करण्यात आल्याचा दावा करण्यात येत आहे. दुर्घटनेवेळी पुलावर सुमारे १०० पर्यटक होते, असे सांगितले जाते. दरवर्षी पावसाळ्यात पर्यटनाचा आनंद घेण्यासाठी हजारो नागरिक कुंडमळा येथे येतात. नेहमीप्रमाणे रविवारीही शेकडो नागरिक कुंडमळा येथे पर्यटनासाठी आले होते. गत काही दिवस सतत पाऊस होत असल्याने इंद्रायणी नदीत मोठ्या प्रमाणात पाणी आले होते. शेलारवाडी ते कुंडमळा या २ गावांना जोडणारा एक पूल आहे. हा पूल किमान ४० ते ५० वर्षे जुना असल्याचे सांगण्यात येते. पूर्वी हा पूल संपूर्णपणे लोखंडी ढाच्याचा होता.

काही वर्षापूर्वी पुलाच्या दोन्ही बाजूच्या काही भागाचे सिमेंट बांधकाम करण्यात आले आहे मात्र, पुलाचा मध्य भाग हा लोखंडीच होता. पर्यटनाला आलेल्या काही नागरिकांनी आपल्या दुचाकी या पुलावर आणल्या तर काही पर्यटक पुलावर उभे होते. क्षमतेपेक्षा अधिक भार झाल्याने अचानक मोठा आवाज झाला आणि हा लोखंडी पूल कोसळला. पूल कोसळल्यानंतर पुलावरील सर्व पर्यटक आणि त्यांच्या दुचाकी नदीच्या प्रवाहात पडल्या. काही पर्यटक लोखंडी पुलाच्या साच्याखाली अडकले त्यामुळे त्यांचा जागीच पाण्यात बुडून मृत्यू झाला तर काही पर्यटक पुराच्या पाण्यासोबत वाहून गेले. या दुर्घटनेत लोखंडी पुलाचा संपूर्ण सांगाडा नदीत कोसळला. काही पर्यटक या पुलाच्या सांगाड्याखाली अडकले. प्रशासनाने ४ मोठ्या क्रेनच्या सहायाने सांगाडा काढण्याचा प्रयत्न केला मात्र नदीचे पाणी, नदीचे पात्र, पात्रातील खडक आणि पावसामुळे मदतकार्याला अडथळे येत होते. दुर्घटनेची माहिती मिळताच अनेक लोकप्रतिनिधी व अधिका-यांनी घटनास्थळी धाव घेतली आणि मदत व बचावकार्य सुरू केले. दुर्घटना घडल्यानंतर या ठिकाणी परिसरातील नागरिकही मोठ्या प्रमाणात दाखल झाले. बघ्यांची गर्दी झाल्याने मदतकार्यात अडथळा येत होता. त्यातच पाऊस सुरू झाल्याने बचावकार्य अवघड बनले. अंधार पडल्यानंतरही बचावकार्य सुरू होते.

इंद्रायणी पूल दुर्घटनेनंतर राज्यातील धोकादायक पुलांचा प्रश्न ऐरणीवर आला असून राज्यातील जुन्या धोकादायक पुलांचे ऑडिट करण्याचे निर्देश उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी दिले आहेत. या दुर्घटनेतील मृतांच्या कुटुंबीयांप्रती सहवेदना व्यक्त करतानाच जखमींवर तातडीने उपचार करण्याचे निर्देश शिंदे यांनी दिले. पर्यटनस्थळी विशेषत: सुटीच्या दिवशी होणारी गर्दी लक्षात घेता जिल्हा प्रशासनाने आपत्कालीन यंत्रणा तत्पर ठेवावी, अशा सूचनाही त्यांनी दिल्या तसेच या दुर्घटनेची चौकशी करण्याचे आदेशही त्यांनी दिले. म्हणजे एखादी दुर्घटना घडल्यानंतरच सरकारला, प्रशासनाला जाग येत असते. चौकशीचे सोपस्कार करण्यासाठी घटना घडावी लागते; परंतु घटना घडू नये यासाठी खबरदारी घेण्याचा विचार सूचत नाही. पाऊस पुन्हा सक्रीय झाल्याने राज्यात विविध दुर्घटनांमध्ये रविवारी १९ जणांचा बळी गेला. रविवार हा घातवार ठरला. माथेरान येथे 'शार्लोट लेक'मध्ये बुडून तिघांचा मृत्यू झाला. नांदेडमध्ये ५ जण गोदावरी नदीत बुडाले. खानदेशात वीज पडून ७ जणांचा मृत्यू झाला तर दक्षिण रायगडमध्ये ४ जण बुडाले.

तीर्थक्षेत्र बासर येथे दर्शनासाठी देशभरातून भाविक येतात त्यामुळे येथे नेहमीच भाविकांची वर्दळ असते. दर्शनासाठी आलेल्या ५ भाविक युवकांचा गोदावरी नदीत बुडून मृत्यू झाला. मयत युवक हे हैदराबाद येथील रहिवासी आहेत. सुटीचा आनंद लुटण्यासाठी माथेरान येथे आलेल्या मुंबईच्या काही युवकांच्या सहलीची रविवारी दु:खद अखेर झाली. 'शार्लोट लेक' परिसरात पोहण्याच्या व सेल्फी घेण्याच्या नादात ३ तरुणांचा पाण्यात बुडून मृत्यू झाला. अलिकडे सेल्फी घेण्याचा नाद अनेकांच्या मृत्यूस कारणीभूत ठरत आहे. सुटीचा आनंद लुटण्यास काहीच हरकत नाही; परंतु भान राखण्याचा विसर पडला की लाख मोलाचा जीव क्षणार्धात नाहीसा होतो आणि त्याच्या कुटुंबालाही दु:खाच्या खाईत लोटतो हे लक्षात ठेवायला हवे. म्हणून प्रत्येकाने सद्सद विवेकबुद्धीचा वापर केला पाहिजे. आपण काय करतो आहोत याचे भान ठेवायलाच हवे. ब-याच वेळा नैसर्गिक आपत्तीमुळेही जीव जातात. खानदेशात गत २ दिवस विजेच्या कडकडाटासह वादळी पावसाचे तांडव सुरू होते.

या वादळी पावसात जळगाव जिल्ह्यात वीज पडून ५ जणांचा तर धुळे जिल्ह्यात एकाचा मृत्यू झाला. वीज पडण्याच्या घटना बहुतेक वेळा शेत शिवारात घडतात त्यामुळे शेतकरी वर्गाने विशेष काळजी घ्यायला हवी. पाऊस सुरू झाल्यानंतर त्यांनी झाडांचा आश्रय घेणे टाळावे आणि सुरक्षित स्थळी पोहोचण्याचा प्रयत्न करावा. केदारनाथजवळील गौरीकुंड येथे रविवारी पहाटे १ हेलिकॉप्टर कोसळून झालेल्या दुर्घटनेत पायलटसह सर्व ७ प्रवाशांचा मृत्यू झाला. त्यात महाराष्ट्रातील जैस्वाल कुटुंबातील तिघांचा समावेश आहे. खराब हवामानात उड्डाण केल्याने हेलिकॉप्टर जंगलात कोसळल्याचे सांगण्यात येते. माणसाचे जगणे बेभरवशाचे आणि जीवन मृत्यूच्या हिंदोळ्यावर आहे. कोणतीही गोष्ट घाईघाईने, कोणत्याही नियोजनाशिवाय केली की ते दुर्घटनेला आमंत्रण देणारे ठरते. कोणतेही काम करताना शिस्त बिघडणार नाही याची काळजी घ्यायला हवी. इंद्रायणीकाठी पर्यटकांची समाधी लागली; पण ती वेगळ्या अर्थाने. अशी वेळ कोणावरही येऊ नये.

# योग दिनानिमित्त योग सत्रांबरोबरच वृक्षारोपण, स्वच्छता मोहीम व पर्यावरण संवर्धन करणार-प्र.मुख्य कार्यकारी अधिकारी वासुदेव सोळंके

## सर्व ग्राम आरोग्य पोषण पाणी पुरवठा व स्वच्छता समित्यांच्या सहकार्याने होणार सर्व उपक्रम

बीड । प्रतिनिधी

**२१ जुन २०२५ रोजीच्या ११ व्या आंतरराष्ट्रीय योग दिनानिमित्त जिल्हयातील जलजीवन मिशन व स्वच्छ भारत मिशन पर्यावरण संवर्धन होत असलेल्या ग्रामपंचायतीमध्ये ग्राम आरोग्य पोषण पाणी पुरवठा व स्वच्छता समित्या यांच्या सहकार्याने योग सत्रांबरोबरच वृक्षारोपण, स्वच्छता मोहीम व समुदायाच्या पुढाकारातून पर्यावरणीय उपक्रम राबविण्यात येणार असल्याची माहिती जिल्हा परिषदेचे प्रभारी मुख्य कार्यकारी अधिकारी वासुदेव सोळंके यांनी दिली.**

जिल्ह्यात पाणीपुरवठा व स्वच्छता व पर्यावरण संवर्धन या उपक्रमात असलेल्या ग्रामपंचायत मध्ये ११ वा आंतरराष्ट्रीय योग दिन २०२५ निमित्ताने येत्या शनिवारी २१ जून २०२५ रोजी देशात विशेष कार्यक्रमाचे आयोजन होत आहेत. त्याचाच एक भाग म्हणून - योग संगम या कार्यक्रमांमध्ये योग संगम किंवा मुख्य आंतरराष्ट्रीय योग दिन कार्यक्रम दि.२१ जून २०२५ रोजी सकाळी ६:३० ते ७:४५ रोजी आयोजित करण्यात आला आहे.हा कार्यक्रम मा.पंतप्रधान यांच्या उपस्थितीत विशाखापट्टणम, आंध्रप्रदेश येथून राष्ट्रीय कार्यक्रमाशी समांतरपणे होणार आहे. योग संगम हे व्यापक जनसहभाग आणि मोठ्या प्रमाणावर योग प्रात्यक्षिकांची परंपरा पुढे नेण्यासाठी आयोजित करण्यात आले आहे.यासाठी जिल्हयातील सर्व ग्रामपंचायतीमधील ग्राम आरोग्य पोषण पाणी पुरवठा व स्वच्छता समित्या किंवा परिसरातील आयुषमान आरोग्य मंदिर यांच्या सहकार्यानेही आयोजित करण्यात येणार आहेत.यासाठी ग्राम आरोग्य पोषण पाणी पुरवठा व स्वच्छता समित्या यांनी क्यूआर कोड १ स्कॅन करून योग संगमसाठी मानक कार्यप्रणाली माहिती व इतर संदर्भ सामग्री क्यूआर कोड २ स्कॅन करून मिळवता येईल. कार्यक्रम क्रमांक २ - हरित योग मध्ये हरित योग उपक्रम पारंपरिक योगाभ्यासासोबत पर्यावरणीय शाश्वततेला देखील प्रोत्साहन देण्यात येणार आहे.यावर्षीच्या योग दिनाच्या कार्यक्रमांतर्गत योग सत्रांबरोबरच वृक्षारोपण,स्वच्छता मोहीम व समुदायाच्या पुढाकारातून राबविण्यात येणाऱ्या पर्यावरणीय उपक्रमांचा समावेश केला जाणार आहे.ग्राम आरोग्य पोषण पाणी पुरवठा व स्वच्छता समित्या या उपक्रमांना हरित योग अंतर्गत योग दिनाच्या कार्यक्रमात एकत्रितपणे राबविता येणार आहे.योग संगमसाठी मानक कार्यप्रणाली माहिती व इतर संदर्भ साहित्य क्यूआर कोड ३ स्कॅन करून प्राप्त करता येणार आहे. यावर्षीच्या आंतरराष्ट्रीय योग दिनाच्या कार्यक्रमात वॉश केंद्रित (पाणी, स्वच्छता व आरोग्य) दृष्टिकोन समाविष्ट करण्याचे आवाहन करण्याताले आहे, जेणेकरून योग, आरोग्य व वॉश यांच्यातील संबंध अधोरेखित करता येईल.सर्व ग्राम आरोग्य पोषण पाणी पुरवठा व स्वच्छता समित्या यांनी ''योग फॉर वेल बिइंग अँड वॉश '' या संमेलनाचे आयोजन अशा ठिकाणी करावे जिथे जल जीवन मिशन व स्वच्छ भारत मिशन (ग्रामीण ) - २ अंतर्गत मालमत्ता उपलब्ध आहेत.सर्व कार्यक्रम हरित योग किंवा योग संगम या मुख्य कार्यक्रमाशी सुसंगत असावेत. असंही मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी सांगितला आहे. तसेच ग्राम आरोग्य पोषण पाणी पुरवठा व स्वच्छता समिती सदस्य व इतर जल जीवन मिशन आणि स्वच्छ भारत मिशन टप्पा २ संबंधित लाभार्थ्यांची बैठक आयोजित करणे, कार्यक्रमाआधी परिसर व पाणी स्वच्छता आरोग्य संबंधित पायाभूत सुविधा स्वच्छ करणे, महत्त्वाच्या जल जीवन मिशन आणि स्वच्छ भारत मिशन टप्पा २ मालमत्तांसमोर योग सत्र आयोजित करणे , समुदाय, योग क्रिया व योजनांची मालमत्ता दर्शविणाऱ्या स्पष्ट छायाचित्रांची नोंद केली जाणार आहे. दरम्यान सदर आंतरराष्ट्रीय योग दिनाच्या कार्यक्रमात सर्व संबंधित घटकांनी सक्रिय सहभाग घेऊन व कार्यक्रमाचे आयोजन करून कार्यक्रम अधिकाधिक यशस्वी करण्यासाठी प्रयत्न करण्यात यावेत तसेच सदर कार्यक्रमांची जिल्ह्याच्या सामाजिक माध्यमांद्वारे प्रसिद्धी देण्यात यावी असे आवाहन मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी केले आहे.

# शिक्षकेतर कर्मचारी संघटनेच्या जिल्हा उपाध्यक्षपदी संदीप वनवे



बीड । प्रतिनिधी


**माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षकेतर कर्मचारी संघटनेच्या जिल्हा उपाध्यक्षपदी संदीप वनवे यांची निवड करण्यात आली आहे.**

महाराष्ट्र राज्य माध्यमिक शाळा शिक्षकेतर संघटनेचे सरकार्यवाह शिवाजी खांडेकर यांच्या आदेशानुसार गेवराई तालुक्यातील देवपिंप्री येथील माध्यमिक विद्यालयाचे कनिष्ठ लिपिक वनवे संदीप तुळशीराम यांची जिल्हाध्यक्ष संजय डावकर, सचिव नामदेव वाघ यांनी जिल्हा उपाध्यक्षपदी निवड केली असून त्यांना नियुक्तीचे पत्र देण्यात आले आहे. त्यांच्या निवडीबद्दल संघटनेच्या पदाधिकाऱ्यांनी अभिनंदन करून शुभेच्छा दिल्या आहेत.

# पेठ बीड पोलिसांनी गहाळ झालेले तेरा मोबाईल केले परत

बीड । प्रतिनिधी

**पोलीस ठाणे पेठ बीड येथे नागरिकांचे मोबाईल गहाळ झाले बाबतच्या तक्रारी प्राप्त होत असल्याने सदर तक्रारीच्या अनुषंगाने गहाळ मोबाईलचा तांत्रीक विश्लेषणाद्वारे शोध घेणे कामी पेठ बीड पोलीस स्टेशनचे पोलीस निरीक्षक श्री. अशोक मुदिराज यांनी पोलीस ठाणे पेठ बीड येथे नेमणुकीस असलेले सायबर डेस्कचे पोलीस उप निरीक्षक मन्सुर इब्राहीम शहा यांना आदेश दिले होते.**



त्याप्रमाणे पोलीस ठाणे पेठ बीड येथील अभिलेखावरील गहाळ मोबाईल शोध मोहीम राबविण्यात आली. त्यामध्ये पोउपनी मन्सुर शहा यांच्या पथकाने पोलीस अधीक्षक कार्यालय, बीड यांचेकडुन माहिती मागवुन तसेच अथक परिश्रम घेवुन तांत्रीक विश्लेषणाद्वारे शोध घेवुन वेगवेळ्या कंपनीचे एकुण १३ मोबाईल किंमत अंदाजे २७८,०००/- रु. किंमतीचे मोबाईल रिकव्हर करण्यात आले. यामध्ये महाराष्ट्रातील विविध जिल्ह्यातुन मोबाईल परत मिळविण्यात यश आले. दिनांक १८ जून रोजी पोलीस अधीक्षक नवनीत कांवत यांच्या हस्ते गहाळ/मिसींग मधील एकुण १३ तक्रारदार यांना मोबाईल परत करण्यात आले. यावेळी या कार्यक्रमासाठी सचिन पांडकर अप्पर पोलीस अधिक्षक बीड, श्रीमती पुजा पवार परिविक्षाधीन पोलीस उप अधीक्षक, अशोक मुदीराज पोलीस निरीक्षक पेठ बीड हे उपस्थीत होते. तक्रारदार यांना त्यांचे गहाळ मोबाईलचा शोध घेवुन सदर तक्रारदार यांना परत केल्याने सदरचे मोबाईल तक्रारदार यांनी पोलीसांच्या कामगिरीवर समाधान व्यक्त केले असुन पोलीसांचे आभार मानले आहेत. त्यामुळे पोलीसांची जनमानसात चांगली प्रतिमा निर्माण झाली आहे. सदरची कार्यवाही पोलीस अधीक्षक नवनीत कॉंवत, मा. अप्पर पोलीस अधीक्षक सचिन पांडकर, पोलीस निरीक्षक अशोक मुदीराज यांचे मार्गदर्शनाखाली पोलीस ठाणे पेठ बीडचे पोलीस उप निरीक्षक मन्सुर शहा, पोह/१३५३ मोठे, पोअं.२२१०/ अश्फाक तसेच टेक्नीकल सेल बीड येथील पोलीस अंमलदार विक्की सुरवसे यांनी पार पाडली.

# वडवणी तालुका मराठी पत्रकार परिषद यंदा पुरस्कार देणार

## बीड जिल्ह्यातल्या उत्कृष्ट मान्यवरांचा केला जाणार सन्मान

वडवणी । प्रतिनिधी

**वडवणी तालुका मराठी पत्रकार परिषदेच्या मुख्य कार्यालयात एक खास बैठक घेऊन तालुका मराठी पत्रकार परिषदेच्या वतीने यंदा बीड जिल्ह्यातल्या उत्कृष्ट मान्यवरांचा सन्मान करत पुरस्कार देणार असल्याचा ठराव मंजूर करण्यात आला आहे.**

मराठी पत्रकार परिषदेचे मुख्य विश्वस्त मा.श्री.एस.एम.देशमुख सर यांच्या आदेशानुसार डिजिटल मिडिया परिषदेचे प्रदेशाध्यक्ष अनिल वाघमारे व जेष्ठ मार्गदर्शक सुधाकर पोटभरे यांच्या मार्गदर्शनाखाली वडवणी तालुका मराठी पत्रकार परिषदे च्या मुख्य कार्यालयात नुकतीच एक महत्त्वपूर्ण बैठक घेऊन बैठकीत सर्वानुमते अनेक निर्णय घेण्यात आले. जेष्ठ मार्गदर्शक सुधाकर पोटभरे, तालुकाध्यक्ष सतिश सोनवणे, सचिव महेश सदरे यांनी आपल्या मराठी पत्रकार परिषदेच्या वतीने बीड जिल्ह्यांत उत्कृष्ट कार्य करणाऱ्या मान्यवरांचा पुरस्कार देऊन गौरव करण्यासाठी प्रस्ताव मांडला. या प्रस्तावाला सर्वांनी संमती दर्शवली असून बीड जिल्ह्यांत एकुण आकरा तालुक्यातील विविध क्षेत्रातील उत्कृष्ट काम करणाऱ्या मान्यवरांचा अखिल भारतीय मराठी पत्रकार परिषदेच्या वर्धापन दिनानिमित्त खास कार्यक्रमाचे आयोजन करुन राज्यातील मान्यवरांच्या उपस्थितीत विविध क्षेत्रातील मान्यवरांना पुरस्काराने सन्मानित केले जाणार आहे. आपण केलेल्या आपल्या कार्याचा लेखाजोखा तपासणी करून पत्रकारीता,सामाजिक, शैक्षणिक व धार्मिक क्षेत्रातील कार्याचा आधार घेऊन आपले प्रस्ताव सादर करावेत. यासाठी प्रेस नोट प्रसिद्ध करणार आहोत. या पुरस्कारासाठी आपण उत्सुक असल्यास आपले प्रस्ताव कधी केव्हा,कुठे आणि कसे पाठवायचे याची संपूर्ण माहिती लवकरच देणार आहोत. अखिल भारतीय मराठी पत्रकार परिषदेचा वर्धापन दिन हा प्रत्येक वर्षी संपूर्ण महाराष्ट्रात साजरा केला जातो. याच अनुषंगाने आम्ही वडवणी तालुका मराठी पत्रकार परिषदेच्या वतीने नवे ध्येय,नवी वाटचाल बीड जिल्ह्यातील विविध क्षेत्रातील मान्यवरांना पुरस्कार देऊन सुरू करत आहोत. असा सर्वानुमते ठराव आम्ही संमत करून पत्रकारांच्या हिताच्या विविध विषयावर देखील सविस्तर चर्चा करण्यात आली. बैठकीला डिजिटल मिडिया परिषदेचे प्रदेशाध्यक्ष अनिल वाघमारे,जेष्ठ मार्गदर्शक पत्रकार सुधाकर पोटभरे,तालुकाध्यक्ष पत्रकार सतिष सोनवणे,सचिव पत्रकार महेश सदरे,उपाध्यक्ष पत्रकार धम्मपाल डावरे, डिजिटल मिडिया परिषदेचे तालुका अध्यक्ष संपादक ओमप्रकाश साबळे, कोषाध्यक्ष पत्रकार वाजेद पठाण,शहराध्यक्ष पत्रकार गितांजली लव्हाळे मॅडम,पत्रकार हरिभाऊ पवार, पत्रकार अतुल जाधव,पत्रकार संभाजी लांडे, पत्रकार राम चौरे, पत्रकार विजय राऊत सह आदींची उपस्थिती होती.



## पान १ वरून...

### रूई पिंपळ्यात कर्जबाजारी

व्यक्त केली जात आहे.बाळासाहेब संतराम भांगे वय ३२ यांचे एकत्रित कुटुंब आहे.शेतातील सततची नापिकी दोन मुलींच्या संगोपनाची डोक्यावर मोठी जबाबदारी तसेच खाजगी व्यक्तींकडुन घेतलेलं कर्ज कसे फेडायचे या सर्व संकटांना कंटाळून बाळासाहेब भांगे यांनी वीष प्राशन करून आत्महत्या केली.त्यांच्या पश्चात आई,पत्नी,दोन लहान मुली असा परिवार आहे.सदरील कुटुंबाला शासनाचे घरकुल तसेच आर्थिक मिळण्याचे मागणी जनतेतुन होत आहे.

**दोन चिमुकल्या मुलींची १२ वी पर्यंत शिक्षणाची घेतली जबाबदारी**

रूई पिंपळा येथील आत्महत्या केलेल्या शेतकऱ्यांच्या दोन लहान चिमुकल्या मुलींची १२ वी पर्यंत संपूर्ण शिक्षणाची जबाबदारी रूई पिंपळा गावचे विकासाभिमुख युवा सरपंच मयुर आंधळे यांनी घेतली आहे.त्यामुळे उघड्यावर पडलेल्या शेतकऱ्यांच्या कुटुंबाला फार मोठा आधार मिळाला असल्याचे व सरपंच मयूर आंधळे यांचे कौतुक होत आहे.

------------

### मल्टिस्टेटच्या दारात ठेवीदाराने घेतला

न मिळाल्याने हतबल झालेल्या सुरेश आत्माराम जाधव या गेवराई तालुक्यातल्या ४६ वर्षीय वडिलांनी मल्टीस्टेटच्या गेटवर गळफास घेऊन आत्महत्या केल्याची घटना बुधवारी घडली आहे. सुरेश जाधव यांनी छत्रपती मल्टीस्टेटमध्ये २०२० साली मुलांच्या शिक्षणासाठी ११ लाख ५० हजार रुपयांची मुदत ठेव ठेवली होती. परंतु मागील दीड वर्षात जिल्ह्यातील जवळपास दहा मल्टीस्टेटने गाशा गुंडाळला. आयुष्यभराची जमापुंजी म्हणून ठेवलेले पैसे परत मिळावे यासाठी सुरेश जाधव दोन महिन्यांपासून मल्टीस्टेटचे उंबरठे झिजवत होते. यापूर्वी देखील त्यांनी विषारी औषध पिऊन आत्महत्या करण्याचा प्रयत्न केला होता. त्यामुळेच मल्टीस्टेटने अडीच लाख रुपये त्यांना परत दिले. मात्र उर्वरित नऊ लाख रुपये मिळावे यासाठी सुरेश जाधव आपल्या कुटुंबासमवेत वारंवार मल्टीस्टेटमध्ये जात होते. अखेर जाधव यांनी बुधवारी (दि. १८)पहाटे तीन वाजण्याच्या सुमारास छत्रपती मल्टीस्टेटच्या दारासमोर गळफास लावून आत्महत्या केली. याप्रकरणी तक्रारदार कविता सुरेश जाधव यांच्या तक्रारीवरून आरोपी संतोष उर्फ नाना बसंत भंडारी यांच्या विरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

---------

### पैठणमध्ये संत एकनाथ महाराज

आहे. एकूण १८ दिवसांचा पालखी प्रवास असून विविध ठिकाणी नित्यधार्मिक कार्यक्रम, हरिपाठ व भजन आयोजित करण्यात आले आहेत.

---------

### पांडूरंगाची इच्छा असेल

इच्छा असेल तर अजित पवार मुख्यमंत्री होतील असे वक्तव्य राष्ट्रवादीच्या खासदार सुनेत्रा पवार यांनी केले आहे. देहूत तुकोबारायांच्या पालखीचे पंढरपूरकडे प्रस्थान झाले आहे. यावेळी खासदार सुनेत्रा पवार यांनी तुकोबारायांचे दर्शन घेतले आहे. त्यानंतर सुनेत्रा पवारही वारकऱ्यांसह भक्तीरसात तल्लीन झाल्याचे पाहायला मिळाले. महिलांसह फुगडी खेळण्याचा आनंदही त्यांनी घेतला. चांगला पाऊस पडावा, शेतकरी सुखी व्हावा अशी प्रार्थना केल्याचेही सुनेत्रा पवारांनी सांगितले आहे.

------------

### मुख्यमंत्र्यांच्या वाढदिवसानिमित्त

एक उत्तम मार्ग आहे. त्यामुळे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या वाढदिवसानिमित्त सामाजिक कार्यकर्ते परमेश्वर येवले यांच्या वतीने पाटोदा तालुक्यात शैक्षणिक उपक्रम राबण्यात येणार आहे. पाटोदा तालुक्यातील जि. प. प्रा. शाळा व अंगणवाडी येथील सर्व विद्यार्थ्यांना स्कुल बॅग वाटप करण्यात येणार आहेत. या स्कूल बॅगवर मुख्यमत्र्यांचे छायाचित्र असून मुंबई येथील मंत्रालय कार्यालयात मुख्यमंत्र्यांची भेट घेऊन परमेश्वर येवले यांनी त्यांना स्कूल बॅग दाखवून उपक्रमाची माहिती दिली. यावेळी मुख्यमंत्र्यांनी येवले पाटील यांच्या शैक्षणिक उपक्रमाचे कौतूक केले आहे.

राज्य लोकतंत्र
नवी दिशा... नवे विचार.....
गुरुवार दि. १९ जून २०२५


# उद्योग व्यवसाय वाढीसाठी गुणवत्ता व दर्जा टिकवणे गरजेचे -के. डी. दांडगे

जालना । प्रतिनिधी

मिटकॉन प्रशिक्षण केंद्र व उद्योजकता विकास विभाग यांच्या वतीने जालना दि.१८ जुन २०२५ रोजी एक दिवशीय व्यावसायिक कार्यशाळा संपन्न झाली. या कार्यशाळेत शासनाच्या विविध शासनस्तरावर असलेल्या कर्ज प्रकरणाच्या योजना याची सविस्तर उद्योग / व्यवसाय उभारणीसाठी सखोल माहितीचा वापर कसा करावा याची चर्चा झाली.तसेच उद्योग व्यवसाय वाढीसाठी गुणवत्ता व दर्जा टिकवणे हे महत्त्वाचे आहे असे प्रतिपादन के डी दांडगे जिल्हा प्रकल्प अधिकारी मिटकॉन यांनी केले. या वेळी के व्ही जाधव, बाबासाहेब सोनटक्के, अशोक श्रिसुंदर, मनोज गुढेकर, मायावती जाधव ,पवन गुढेकर, नितीन गुढेकर यांची उपस्थिती होती. या कार्यशाळेत उद्योग संधी मार्गदर्शन, उद्योग प्रेरणा, संघटन कौशल्य, उद्योजकीय गुणसंपदा,व्यक्तीमत्व विकास, प्रभावी संभाषण कौशल्य, उद्योग व्यवस्थापन, जागेची निवड, बाजारपेठ पाहनीतंत्र, शासकीय व निमशासकीय योजना, जिल्हा उद्योग केंद्राच्या विविध योजना,खादीग्राम उद्योग मंडळाच्या योजना, महामंडळाच्या विविध योजना, राष्ट्रीय पशुधन विकास योजना,प्रकल्प अहवाल तयार करणे, कर्ज प्रस्ताव तयार करणे, बँकेची कार्यप्रणाली , विक्री व्यवस्था,भांडवल उभारणी ,मनुष्यबळ , विमा संरक्षण, शासकीय परवाने या विषयी मार्गदर्शन करण्यात आले आहे.अधिक माहिती व मार्गदर्शनासाठी के डी दांडगे ,जिल्हा प्रकल्प अधिकारी मिटकॉन यांच्याशी संपर्क करा

# नोकरीच्या संधी विपुल : विद्यार्थ्यांकडे हवे स्किल आणि विल - प्रा.प्रदीप रोडे

## आवडीचे करिअर निवडण्यासाठी पालकांनी विद्यार्थ्यांना प्रोत्साहन द्यावे : नागेश जोंधळे

**अंबाजोगाई । प्रतिनिधी**

**नालंदा फाऊंडेशन, बीड व आई फाऊंडेशन, अंबाजोगाई यांच्या संयुक्त विद्यमाने अंबाजोगाईत रविवार, दिनांक १५ जुन २०२५ रोजी शहरातील आद्यकवी मुकुंदराज सांस्कृतिक सभागृहात नि:शुल्क करिअर गाईडन्स सेमिनार व विविध क्षेत्रातील तज्ज्ञांचे मार्गदर्शन आणि गुणवंतांच्या भव्य सत्कार सोहळ्याचे आयोजन करण्यात आले होते.**

इयत्ता १० वी, १२ वी, पदविका व पदवीनंतर पुढे काय ? असा प्रश्न विद्यार्थी आणि त्यांच्या पालकांना नेहमीच पडतो. अशावेळी आपल्या पाल्याला व आपल्या स्वतःला जर नि:शुल्क करिअर गाईडन्स सेमिनार व विविध क्षेत्रातील तज्ज्ञांचे मार्गदर्शन मिळाले तर किती बरे होईल. म्हणून हाच विधायक हेतू व सकारात्मक विचार करून नालंदा फाऊंडेशन, बीड व आई फाऊंडेशन, अंबाजोगाई यांच्या संयुक्त विद्यमाने अंबाजोगाईत नि:शुल्क करिअर गाईडन्स सेमिनार व विविध क्षेत्रातील तज्ज्ञांचे मार्गदर्शन आणि इयत्ता १० वी, १२ वी उत्तीर्ण गुणवंत विद्यार्थी तसेच समाजाच्या विविध क्षेत्रात सातत्यपूर्ण सर्वंकष कामगिरी करीत उल्लेखनीय योगदान देणाऱ्या मान्यवरांच्या भव्य सत्कार सोहळ्याचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी शिक्षणतज्ज्ञ प्रा.प्रदिप रोडे (संस्थापक, नालंदा फांऊडेशन, बीड.) हे होते. तर यावेळी विचारमंचावर प्रमुख मार्गदर्शक म्हणून सहयोगी अधिष्ठाता तथा प्राचार्य डॉ.बाबासाहेब ठोंबरे (कृषी महाविद्यालय, लातूर) आणि प्रभावी करिअर मार्गदर्शक म्हणून सर नागेश जोंधळे (संस्थापक, आई सेंटर प्रो तथा प्रेरणादायी वक्ते) तसेच यावेळी राजेंद्र घोडके (सामाजिक कार्यकर्ते), विधीज्ञ व कायदेशीर सल्लागार ॲड.राहुल बनसोडे (नाशिक), प्रा.राम गायकवाड (बीड) या मान्यवरांची विशेष उपस्थिती होती. प्रारंभी छत्रपती शिवाजी महाराज, महात्मा ज्योतिराव फुले, सावित्रीमाई फुले आणि भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर या महामानवांना अभिवादन करण्यात आले. सुरूवातीला डॉ.विकास वाघमारे यांनी प्रास्ताविक केले. त्यानंतर उपस्थित मान्यवरांचे आयोजकांकडून स्वागत करण्यात आले. तर मान्यवरांच्या हस्ते डॉ.बाबासाहेब आंबेडकर राष्ट्रीय सन्मान - २०२५ पुरस्कार जगन सरवदे (सामाजिक), रणजित डांगे (पत्रकारिता), सर नागेश जोंधळे (लीडरशिप व नेशन बिल्डिंग), डॉ.किर्तीराज लोणारे आणि प्राचार्या स्वाती त्रिशोक वाकळे (शिक्षण), प्रा.सुनिल वाघमारे व सुमित खोत (माहिती तंत्रज्ञान) यांना सन्मानपूर्वक प्रदान करण्यात आले. सोबतच द आयडीयल इंडियन बुक ऑफ रेकॉर्ड्स चे मानकरी सहयोगी अधिष्ठाता तथा प्राचार्य डॉ.बाबासाहेब ठोंबरे (कृषी महाविद्यालय अंबाजोगाई येथील परिसरात ३० हजार वृक्ष लागवडीकरीता), कु.श्रेया पुनम ढोले (एक लाख इंग्रजी वाक्य लिहील्याबद्दल), पंकज भटकर यांनी धम्म लिपीतील स्व:हस्ताक्षरात व कोरीव काम करून तयार केलेले भारतातील




प्रथमच घराचे नांव फलक करण्याचा विक्रम केल्याबद्दल. आणि आय ई सेंटर प्रो या संस्थेने भारतीय संविधानाच्या अमृत महोत्सवानिमित्त १५ ऑगस्ट २०२४ रोजी विश्वविक्रमवीर लेखक सर नागेश जोंधळे यांच्या संकल्पनेतून व नेतृत्वात भारतीय संविधान भान आणि सामाजिक जाण या देशभक्तीचा अभिनव उपक्रमातून मानवी साखळी करून भारतीय संविधानातील मूळ ३९५ कलमांचे फलक तयार करून व त्याचे मानवी साखळी करून वाचन करून विविधतेत एकात्मतेचा संदेश दिला त्याबद्दल गौरवपूर्ण सन्मान करण्यात आला. यावेळी पुढील विद्यार्थ्यांना आई सेंटर प्रो-चॅम्पियन इन मी-पुरस्कार देण्यात आले. यातील विजेते सान्वी गुट्टे (प्रथम), विश्वेश्वरी सरदेशमुख (द्वितीय), श्रेयश तिडके (तृतीय) तसेच पंकजा काळे, गीतांजली केंद्रे, आदिल शेख, आशिष साखरे, योगश्री म्हेत्रे, शिवतेज अंजान, द्रोण जाधव हे उत्तेजनार्थ पारितोषिकांचे मानकरी ठरले. तसेच आई सेंटर प्रो-द डायनॅमिक कम्युनिकेटर आत्मविश्वासाने आणि अस्खलितपणे इंग्रजी बोलण्याचे ३१ दिवसांचे आव्हान लिलया पार पाडणारे विजेते - माहेश्वरी सरदेशमुख (प्रथम), समर्थ साखरे (द्वितीय), हुजैफ शेख (तृतीय) तसेच उझैर शेख, नयन जाधव, बलराज गायकवाड, अर्णवी केंद्रे, मनस्वी वाघमारे, जयंत वाघमारे, सोहम अंबड, विश्वेश्वरी सरदेशमुख, सोनम सानप, आदर्श वाघमारे, अमृता जाधव, स्वराज जावळे, वैशाखी चोपडे, आदिश्री बिराजदार, प्रथमेश झिटे, श्रीरंग तिडके हे उत्तेजनार्थ पारितोषिकांचे मानकरी ठरले. यावेळी प्रमुख मार्गदर्शक म्हणून बोलताना शिक्षणतज्ज्ञ प्रा.प्रदीप रोडे म्हणाले की, विद्यार्थ्यांना करिअर विषयी योग्य मार्गदर्शन, माहिती मिळावी, त्यांच्यात आत्मविश्वास निर्माण व्हावा असा या कार्यक्रमाचा मुख्य उद्देश व विधायक हेतू आहे. अंबाजोगाई हे मराठवाड्याचे पुणे आहे. पाल्यांसाठी पालकांनी काय करावे, मुलांवर आपली मतं, इच्छा, अपेक्षा थोपू नयेत, पाल्याचा कल ओळखा, नवे बदल स्विकारा, परकीय भाषा अवगत करा, मोबाईलचा अतिवापर टाळावा, मुलांच्या हातात पुस्तक द्या, मुलांची इतरांबरोबरची तुलना टाळा, परदेशात नौकरीच्या संधी विपुल प्रमाणात उपलब्ध आहेत, त्यामुळे विद्यार्थ्यांनी स्कील आणि वील आत्मसात करावे यासाठी शिक्षण व नौकरी उपलब्ध करून देण्याच्या क्षेत्रात नालंदा फौंडेशन कौतुकास्पद कार्य करीत आहे असे शिक्षणतज्ज्ञ प्रा.रोडे यांनी सांगितले. सुरूवातीला सहयोगी अधिष्ठाता तथा प्राचार्य डॉ.ठोंबरे यांनी विद्यार्थी व पालकांना संबोधित करताना थ्री डी - समर्पण (डेडीकेशन), दृढनिश्चय (डिटरमिनेशन) आणि एकनिष्ठपणा (डिवोशन) या त्रिसुचीचा वापर करून मोठे यश संपादन करता येते असे अधोरेखित केले. तर सर नागेश जोंधळे यांनी सांगितले की, आवडीचे करिअर निवडण्यासाठी पालकांनी मुलांशी सुसंवाद साधावा, संधी द्यावी, पालकांनी स्वतःचे स्वप्न मुलांवर थोपू नये, हसत-खेळत त्यांच्यातील कला-गुणांना वाव द्यावा, आज जागतिक स्पर्धेत तसेच संगणकीय आर्टिफिशियल इंटेलिजन्स अर्थात कृत्रिम बुद्धिमत्ता, फॅशन डिझायनिंग, उद्योजकता या मानसिकतेतून उत्तुंग यश मिळवण्यासाठी घरात पोषक असे वातावरण ठेवत संवादयुक्त करिअर निवडण्यासाठी संधी द्यावी असे मत करियर मार्गदर्शक तथा प्रेरणादायी वक्ते सर जोंधळे यांनी व्यक्त केले. प्रास्ताविक डॉ.विकास वाघमारे यांनी केले. तर सुत्रसंचालन प्रा.राहुल सुरवसे यांनी करून उपस्थितांचे आभार डॉ.किर्तीराज लोणारे यांनी मानले. तर सोमनाथ विभुते, ॲड.दिलीप गोरे, गायक बळीराम उपाडे, धम्मदीप वैद्य, आकाश वेडे, नितीन सरवदे, दत्ता घोडके, आई सेंटरचे जयश्री समसे, शंकर समसे, साक्षी कराड, मोहिनी गडकर, यश इंगळे, आदर्श वाघमारे, आदित्य काळे, मुक्ताराम कराड, सुशिल गडकर व सर्व फॅमिली मेंबर्स यांनी विशेष परिश्रम घेतले. या कार्यक्रमासाठी अंबाजोगाई शहर, तालुका व पंचक्रोशीतील शैक्षणिक, सामाजिक तसेच विविध क्षेत्रात बहुमोल कामगिरी करणारे सजग नागरिक, पालक, विद्यार्थी - विद्यार्थीनी यांचा मोठ्या संख्येने उत्स्फूर्त असा प्रतिसाद व उपस्थिती होती. यावेळी शहरी तथा ग्रामीण भागातील इयत्ता दहावी - बारावीतील २०० गुणवंत विद्यार्थी - विद्यार्थीनी तसेच विविध क्षेत्रातील उल्लेखनीय कामगिरी करणाऱ्या यशवंतांचा ग्रंथ, पुष्पगुच्छ, प्रमाणपत्र व सन्मानचिन्ह देऊन त्यांचा गौरव मान्यवरांच्या हस्ते करण्यात आला. प्रथमच एवढ्या मोठ्या व्यासपीठावर आपल्या पाल्यांना कौतुकाची थाप मिळत असताना पाहण्याचा आनंद पालकांच्या चेहऱ्यावरती स्पष्टपणे दिसत होता. काही पालक व विद्यार्थ्यांचे तर त्यांना मिळालेल्या सन्मानाने व कौतुकाने आनंद आश्रू अनावर झाले होते. कार्यक्रमाच्या यशस्वितेसाठी संयोजक, सर्व सन्माननीय सदस्य नालंदा फाऊंडेशन, बीड व आई फाऊंडेशन, अंबाजोगाई यांच्या वतीने पुढाकार घेण्यात आला.

# प्रत्येक कर्मचाऱ्यांनी सेवानिवृत्ती नंतरचे आयुष्य सामाजिक उन्नतीसाठी खर्च करावे -खांडेकर

**बीड । प्रतिनिधी**

शासकीय अथवा निमशासकीय सेवेतून सेवानिवृत्त होणाऱ्या प्रत्येक कर्मचाऱ्यांनी नंतरचे आयुष्यात समाजाच्या उन्नतीसाठी, प्रगतीसाठी आणि सामाजिक कार्यासाठी खर्च करावे असे आवाहन बडे बाबा शिक्षण संस्थेच्या सचिव श्रीमती मंगलाताई खांडेकर मॅडम यांनी श्री नारद स्वामी विद्या मंदिर या शाळेतील सेवक नितीन दादा वाघमारे यांच्या सेवानिवृत्ती निमित्ताने आयोजित करण्यात आलेल्या कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानावरून बोलताना केले. यावेळी व्यासपीठावर युवा संचालक श्री प्रसाद संपतराव खांडेकर, शाळेचे मुख्याध्यापक श्री पाखरे सर, लहूजी शक्तीसेना(अध्यक्ष मराठवाडा) विजय चांदणे, जेष्ठ शिक्षक कागदेसर, सिरसट सर, दाबेकर मॅडम, जाधव, राठोड, सेवक इतापे आदी कर्मचारी उपस्थित होते.

बीड शहरातील नवीन मोंढा मंदिर एम. आय. डी. रोड परिसरात असलेल्या श्री नारद स्वामी विद्या मंदिर या शाळेतील श्री सेवक नितीन दादा वाघमारे हे नुकतेच नियत वयोमानुसार सेवानिवृत्त झाले आहेत. त्यांच्या सेवानिवृत्ती कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी संस्थेच्या सचिव श्रीमती



मंगलाताई खांडेकर मॅडम या होत्या. या वेळी नितीन दादा वाघमारे यांच्या विषयी काही मान्यवरांनी आपले मनोगत व्यक्त करताना वाघमारे यांच्या जीवनाविषयी व कार्याविषयी माहिती सांगितली. त्यांचे विचार त्यांच्या कामाचे उदाहरणासह काही किस्से विषद केले. त्यानंतर अध्यक्षस्थानावरून मार्गदर्शन करताना श्रीमती मंगलाताई खांडेकर मॅडम म्हणाल्या की आमच्या संपूर्ण संस्थेमध्ये श्री नितीन वाघमारे हे अत्यंत, शांत संयमी आणि सदैव हसमुख चेहऱ्याचे होते. त्यांनी प्रामाणिकपणे आपली शाळेतील नोकरी यशस्वीरित्या पार पाडली. सेवक हा शाळेचा महत्वाचा घटक असतो. उद्यापासून नितीन वाघमारे हे आपलं कर्तव्य बनवताना दिसणार नाहीत. परंतु त्यांची आठवण मात्र कायम येत राहिल. शासकीय अथवा निमशासकीय सेवेत सेवानिवृत्त झालेल्या कर्मचाऱ्यांची जनतेशी नाळ निर्माण झालेली असते. त्यामुळे सेवानिवृत्तीचा काळ हा सामाजिक सेवेत घालवायचा काळ असतो. एकंदरीतच वाघमारे हे देखील सेवानिवृत्ती नंतरचे आयुष्य सामाजिक उन्नतीसाठी खर्च करतील अशी अशा आहे. त्यांच्या आयुष्याच्या दुसऱ्या इनिंगसाठी माझ्या आणि आपल्या सर्व परिवाराच्या खूप खूप शुभेच्छा आणि सदिच्छा आहेत जीवनातील प्रत्येक प्रसंगी आम्ही आपल्यासोबत कायम आहोत असेही यावेळी श्रीमती मंगलाताई खांडेकर मॅडम यांनी सांगितले. या कार्यक्रमास श्री नारदस्वामी विद्यालयातील विद्यार्थी, विद्यार्थीनी शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी शिक्षण प्रेमी नागरिक पालक मोठ्या संख्येने उपस्थितीत होते.

पान ६ वरून...

## अंबाजोगाई पिपल्स बँकेच्या

बँकिंगसाठी सर्वात मोठे व्यासपीठ असलेले भारत कॉपरेटीव्ह बँकिंग समितीच्या वतीने मुंबई येथील द ललित या पंचतारांकित हॉटेलच्या सभागृहात या पुरस्कार सोहळ्याचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी अंबाजोगाई पीपल्स बँकेला एनपीएचे सर्वोत्तम व्यवस्थापन करणारी शहरी सहकारी बँक या गटात भारतरत्न सहकारिता पुरस्कार देवून गौरविण्यात आले. सदरचा पुरस्कार दळणवळण मंत्रालय, भारत सरकारचे उपमहासंचालक सुमनेश जोशी यांच्या हस्ते बँकेचे तज्ज्ञ संचालक संदेश बोराडे, संगणक विभागप्रमुख गणेश रोकडे यांनी स्विकारला. पुरस्काराचे स्वरूप सन्मानचिन्ह, ग्रंथ असे आहे. यावेळी उपमहासंचालक जोशी यांनी, सध्याचे बँकिंग व्यवहार हे डिजिटल असून यामुळे बँकेस अत्यंत वेगाने गती मिळाली आहे. मात्र सायबर क्राईमची जोखीम सुध्दा प्रचंड वाढल्याने सर्वांनी सतर्कता बाळगावी असे सांगितले. भारत जगातील तंत्रज्ञानात लवकरच प्रथम क्रमांकावर असेल असेही ते यावेळी म्हणाले. पुरस्कार प्राप्त झाल्याबद्दल आमच्या प्रतिनिधीशी बोलताना बँकेचे चेअरमन राजकिशोर मोदी यांनी सांगितले की, अंबाजोगाई पीपल्स को-ऑपरेटिव्ह सहकारी बँक लि.अंबाजोगाई या आपल्या बँकेने सुरूवातीपासून एनपीए कमीत-कमी राखला आहे. सर्वच शाखांतून बँकींग विषयक सर्व आधुनिक सेवा, सुविधा, नवे तंत्रज्ञान, डिजिटल व्यवहार बँक सभासद आणि ग्राहकांना पुरविते. यापूर्वी ही बँकेस विविध सन्मान व पुरस्कार प्राप्त झाले आहेत. अंबाजोगाई पीपल्स बँकेच्या सर्वांगिण प्रगती आणि विकासात बँकेचे व्हाईस चेअरमन प्रकाश सोळंकी, सर्व संचालक वसंतराव चव्हाण, ॲड.विष्णुपंत सोळंके, पुरूषोत्तम चोकडा, सुरेश मोदी, ॲड.सुधाकर कराड, श्रीमती वनमाला रेड्डी, संकेत मोदी, शेख दगडू शेख दावल, सौ.स्नेहा हिवरेकर, सुधाकर विडेकर, प्रकाश लखेरा, हर्षवर्धन वडमारे, तज्ज्ञ संचालक सचिन बेंबडे, तज्ज्ञ संचालक सुनिल राजपुरोहित, मुख्य कार्यकारी अधिकारी धनंजय देशपांडे, बँकेचे सर्व सन्माननीय सभासद, ठेविदार, खातेदार, ग्राहक, हितचिंतक, बँकेचे सर्व अधिकारी, शाखाधिकारी, कर्मचारीवृंद व पिग्मी एजंट यांचे सातत्यपूर्ण सहकार्य व योगदान असल्याची माहिती चेअरमन राजकिशोर मोदी यांनी दिली. अंबाजोगाई पीपल्स बँकेस पुरस्कार प्राप्त झाल्याबद्दल सर्वस्तरांतून बँकेचे अभिनंदन व कौतुक होत आहे.

## जिलेटीन स्फोटातील गंभीर

२२ मार्च २०२५ रोजी बर्दापूर पोलिस स्टेशनला विविध कलमान्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. परंतु, या प्रकरणातील फिर्यादी व आरोपी हे एकाच गांवचे व एकमेकांचे नातेवाईक असल्यामुळे त्यांनी आपसांत हे प्रकरण मिटवले की, काय अशी आमची शंका आहे. कारण, सदरील प्रकरणात जप्त केलेली ट्रॅक्टर, पोकलेन ही वाहने बर्दापूर पोलिसांनी सोडून दिली आहेत. यामुळे मजूरी करून आपल्या कुटुंबाचा सांभाळ व उदरनिर्वाह करणारे भारत तुकाराम पवार यांच्यावर अन्याय होत आहे. तरी या प्रकरणातील दोषी आरोपींविरूद्ध बर्दापूर पोलिसांनी भारत तुकाराम पवार यांचा नव्याने (एफ.आय.आर.) नोंदवून उचित कार्यवाही करण्यासाठी उपविभागीय अधिकारी आणि तहसिलदार यांनी आदेशीत करावे व पीडीतास न्याय मिळवून द्यावा, शासनाने सर्वोतोपरी मदत आणि सहकार्य करावे अशी मागणी रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया (खरात गट) चे मराठवाडा विभागीय अध्यक्ष अक्षय भुंबे यांनी केली आहे. निवेदन देताना भिमशक्तीचे संघटक धीमंत राष्ट्रपाल, सामाजिक कार्यकर्ते जीवन गायकवाड, मिनाताई लोंढे यांच्यासह रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया (खरात गट) चे विविध पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.

# जादूटोण्याचा प्रयोग करून एक लाखाचे एक कोटी करून देतो म्हणून पाच लाखाला फसविले

जालना । प्रतिनिधी

किशोर पंडीत शेवाळे रा पेरेजपुर, ता. साकी, जि. धुळे याच्या तक्रारीवरून आरोपी रतन आसाराम लांडगे याने एक लाख रूपयाचे एक कोटी रूपये करून देतो असे आमीष दाखवुन त्यांच्याकडुन ३ लाख रूपये व त्यांच्या पुतण्याकडुन २ लाख ५० हजार रूपये घेवुन आरोपीने त्याच्या राहत्या घरामध्ये त्यांच्यासमक्ष जादु टाणाचे प्रयोग करून दाखवले. व त्यांची एकुण ५,५०,०००/- रूपयांची फसवणुक केल्याची तक्रार दिली त्यावरून पो.स्टे. तालुका जालना गु.र.नं. ४०५/२५, कलम ३१८(४), ३१९(२), ३५२, ३५१(२) भा.न्या.सं. सह कलम ३ महाराष्ट्र नळबळी व इतर आमानुष, अनीष्ट व अघोरी प्रथा व जादुटोणा प्रतिबंध अधिनियम २०१३ अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला. सदर गुन्हयातील आरोपी रतन आसाराम लांडगे, रा. भक्तेश्वर नगर, जालना याच्या राहत्या घराची व गुन्हयातील घटनास्थळाची दोन शासकीय कर्मचारी पंचासमक्ष घरझडती घेतली असता सदर ठिकाणी नमुद आरोपी, व इसम पदमनाभ



जयप्रकाश राणे, व्यवसाय निर्माता, रा. द नेस्ट कॉ. ऑप. सोसायटी, मुंलूड पश्चिम, मुंबई ८०, विकास वसंत अनभवने, रा. कोकणगनर, भांडूप, पश्चिम, मुंबई, ७८, नारायण गजानन जोशी, व्यवसाय - चहाची टपरी, रा. साईप्लाझा बिल्डींग, रूम नं. ११ विरार पश्चिम, मुंबई ७७ हे मिळुन आले. सदर इसम सोबत १ लाख रू घेवुन आलेले होते. त्यांना आरोपीने एक लाखाचे ३ करोड करून देतो असे आमीष दाखवलेले होते. तसेच आरोपीच्या घराची घर झडती घेतली असता त्याच्या घरामध्ये खालील वस्तु मिळुन आलेल्या आहेत.एक लोखंडी जाडीचा पिंजरा, . एक लाकडाची विना, पितळाची मोठी समयी.एक काळयारंगाच्या भालुवा मास्क, एक चमडयाचा मॅट ज्यावर वाघाचे चित्र आहे,एक प्लास्टीकची छडी ज्यावर मानव हाडा सारखी कवटीचे आकार आहे., प्लास्टीकची मानवी कवटी, दोन पाय व दोन हात, पाच बोट असलेला प्लास्टीक चा पंजा, स्टीलचा हदळ, कुंकुचा पंचपाळ, चार नारळ, हदळ, कुंकुची एक-एक पुडी, एक स्टीलचा तांब्या व स्टीलचा एक लहान ग्लास, काळयारंगाची कपडयाची बाहुली, एक स्टीलचा कोयता ज्याची मुठ अंखड असुन त्यावर घोडयाचे चिन्ह आहे,भगव्यारंगाचा महाकाल लिहलेला कुर्ता, एक चाकु ज्याची लाकडी मुठ आहे.,लाल रंगावा कापड, भगव्या रंगाचा ज्यावर महाकाल असे लिहलेला रूमाल, १०८ तुळशीमनी असलेला माळ, ८०००/- तिन पांढऱ्या गोण्यामध्ये नोटेच्या आकाराचे कापलेले कोऱ्या कागदांचे बंडल त्यातील एका गोणीमध्ये सोळा बंडलवर प्रत्येकी एक ५०० रू दराच्या नोट लावलेली होती.

सदर गुन्हयातील आरोपी यास ताब्यात घेवुन त्याच्याकडे गुन्हयाबाबात विचारपुस केली असता त्याने गुन्हयाची कबुली दिल्याने त्यास सदर गुन्हयात १७ जून रोजी अटक करण्यात आली आहे. तसेच आरोपीकडुन १,४९,०००/- रू रोख रक्कम हस्तगत करण्यात आली आहे.

सदर गुन्हयाचा तपास मा. अजयकुमार बंन्सल, पोलीस अधीक्षक, आयुष नोपाणी, अपर पोलीस अधीक्षक, अनंत कुलकर्णी, उपविभागीय पोलीस अधिकारी, यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस करीत आहेत.

## मुद्रांक विभागातील शिपाई पदाच्या भरतीचे आयोजन

जालना । प्रतिनिधी

नोंदणी व मुद्रांक विभागात शिपाई गट-ड संवर्गात २८४ पदे भरतीसाठी दि.२२ एप्रिल २०२५ रोजी जाहिरात प्रसिध्द करण्यात आली होती. तरी आयबीबीएसच्या संकेतस्थावर यशस्वीरित्या भरलेले अर्ज व पात्र उमेदवारांची परीक्षा दि.१ ते ८ जुलै २०२५ या कालावधीत ऑनलाईन घेण्यात येणार आहे. परीक्षेचे प्रवेशपत्र उमेदवारांनी नोंदणी केलेल्या ई-मेलवर आयबीपीएसकडून पाठविण्यात येणार आहे. असे सह जिल्हा निबंधक वर्ग-१ व मुद्रांक जिल्हाधिकारी श्री मुळे यांनी प्रसिध्दीपत्रकाद्वारे सर्वांना कळविले आहे.

जा.क्र.671 /उपनि/बि-2/कलम101/जाहीर प्रगटन/2025 दिनांक - 17/06/2025

### महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम 1960 चे कलम 101 जाहीर प्रगटन

कार्यालय तालुका उपनिबंधक सहकारी संस्था बीड.

मिराई नागरी सहकारी पतसंस्था मर्यादित बीड या संस्थेने खालिल व्यक्तीस कर्ज वाटप केलेले आहे.सदर कर्ज थकीत असल्यामुळे त्यांची स्थावर व जंगम मालमत्ता जप्त करुन कर्जाची वसुली करण्यासाठी सदरहुन संस्थेने महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम 1960 चे कलम 101 अन्वये कार्यवाही करण्यासाठी वसुली प्रमाणपत्राच्या मागणीसाठी प्रकरण दाखल केले आहे.सदर कर्जदार व त्यांचे जामीनदार यांना कार्यालयाने प्रकरणाच्या सुनावणीसाठी पोष्टाने नोटीसा पाठवल्या आहेत.परंतु काही कर्जदार व जामीनदार दिलेल्या पत्त्यावर राहत नसल्याने, गावी हजर नसल्याने किंवा घेण्यास इनकार असल्याने परत आल्या आहेत.तर काही प्रकारच्या नोटीसा तालीम झाल्याच्या पावत्या कार्यालयास मिळाल्या नाहीत करिता या जाहीर प्रगटनाद्वारे कळविण्यात येते की,सदर वसुली प्रमाणपत्र देण्यापुर्वि आपले म्हणने मांडण्यासाठी उपनिबधक सहकारी संस्था तालुका बीड सहकार शक्ती इमारत, दुसरा मजला, जालना रोड, बीड येथे दिनांक 16/06/2025 रोजी वार मंगळवार सकाळी ठिक 11.00 वाजता प्रत्यक्ष अथवा विधीद्वारे उपस्थित राहावे. आपले लेखी अथवा तोंडी म्हणने उत्क दिवशी दाखल करावे.आपण हजर राहुन म्हणने मांडले नाही तर आपले काही म्हणने नाही,असे गृहीत धरुन प्रकरणी निर्णय देण्यात येईल.याची विशेष नोंद घ्यावी.

| अ. क्र. | कर्जदार यांचे नाव व पत्ता | जामीनदार यांचे नाव व पत्ता | सुनावणी दिनांक | वसुल पात्र रक्कम रुपये | चल / अचल मालमत्तेचे विवरण | शाखा व कर्ज खाते क्र |
|---|---|---|---|---|---|---|
| 2 | श्री खरसाडे सखाराम पाराजीराव पत्ता - वासनवाडी, ता.जि.बीड | 1.श्री खरसाडे सोपान मुर्लीधर पत्ता - वासनवाडी, ता.जि.बीड 2.श्री खोड रामेश्वर कचरु पत्ता - वासनवाडी, ता.जि.बीड | 1) 14/05/2025 2) 29/05/2025 3) 26/06/2025 | दि. 31/03/2025 रोजी रु. 41,947 /- व दि.01/04/2025 पासुनचे व्याज व अतिरिक्त खर्च | - | मुख्य शाखा, बीड / कर्ज खाते क्र 194/2000006 |

ठिकाण - बीड
दिनांक - 17/06/2025

स्वाक्षरित
उपनिबंधक सहकारी संस्था ता.बीड

# मुख्याध्यापिकापदी शोभाताई आंधळे यांची निवड झाल्याबद्दल वर्गमित्र मैत्रिणीकडून सत्कार

**वडवणी प्रतिनिधी**

**वडवणी येथील,संस्कार शिक्षण मंडळ संचलित,महाराणी ताराबाई माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयाच्या मुख्याध्यापिका पदी श्रीमती शोभाताई आंधळे-डोईफोडे मॅडम यांची निवड झाल्याबद्दल इयत्ता- १० वीतील इ.सन १९९२ च्या बॅचच्या त्यांच्या वर्गमित्र-मैत्रिणीकडून शाळेत जाऊन शाल,हार,बुके,श्रीफळ देऊन त्यांचा सत्कार व अभिनंदन करून त्यांना शुभेच्छा दिल्या.**

याबाबत अधिक माहिती अशी की, वडवणी शहरातील शैक्षणिक क्षेत्रातील नामांकित असलेल्या महाराणी ताराबाई माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयाच्या मुख्याध्यापिका तथा प्राचार्या पदी कर्तव्यदक्ष आदर्श शिक्षिका श्रीमती शोभाताई आंधळे-डोईफोडे मॅडम यांची निवड झाल्याबद्दल त्यांच्या इयत्ता दहावीतील इसवी सन-१९९२ च्या बॅचच्या वर्गमित्र-मैत्रिणीकडून शाळेत जाऊन त्यांचा शाल,हार,बुके, श्रीफळ देऊन सत्कार व अभिनंदन करून पुढील वाटचालीसाठी त्यांना शुभेच्छा दिल्या. याप्रसंगी वडवणी



शहरातील नामांकित बालरोगतज्ञ डॉ.गुरुदत्तजी महादर,श्री.रामधन नागरगोजे,श्री.धनराज दिवटे,श्री.नंदकिशोर टकले, श्री.लहू टकले,श्री.ज्ञानेश्वरजी गुरसाळी,वडवणी शहरातील नामांकित महाराजा हॉटेलचे चालक-मालक श्री.बाबासाहेब कुरकुटे,सौ.अलका बनसोडे-उजगरे,श्री.बाळूजी फुटाणे या सगळ्यांना एकत्रित करून सत्काराचे नियोजन करणारे श्री.सुग्रीवजी मस्के आदींजन वर्गमित्र मैत्रिणी उपस्थितीत होते.

# पीककर्ज वसुली पुन्हा तळ्यात-मळ्यात

जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेकडून जूनअखेर पीक कर्जाची वसुली मोहीम सुरू असताना माजी आमदार बच्चू कडू यांच्या आंदोलनाच्या पार्श्वभूमीवर राज्य सरकारने शेतकऱ्यांची पीककर्ज माफीसाठी समिती नेमण्याचे जाहीर केले. त्यामुळे जिल्ह्यातील शेतकऱ्यांनी पीक कर्जे भरण्याबाबत पुन्हा तळ्यात-मळ्यात, अशी भूमिका घेतली आहे. लोकसभा, विधानसभेच्या पार्श्वभूमीवर कर्जमाफी जाहीर केली. राज्यात भाजप महायुती सत्तेत आल्यानंतरही मार्चअखेरला अवघे तीन दिवस शिल्लक असताना अर्थमंत्र्यांनी कर्जे भरण्याचे आवाहन केले. सध्याच्या 'कर्जमाफी'बाबत सरकार पुन्हा समिती नेमते आहे. कर्जमाफी येत्या १३ दिवसांत शक्य नाही.

कर्जमाफी मिळाली नाही, तर जुलैत शून्य टक्क्याच्या कर्जावर १२ टक्क्यांनी आकारणी आणि नव्याने कर्जे वितरणास शेतकरी अपात्र ठरतील. पीककर्ज वाटपात राज्यात, जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेचा ८५ टक्के वाटा असतो. पीक कर्जे वसुलीत मार्चला फारसे अपेक्षित नसते. जूनमध्ये मात्र वसुलीसाठी जोरदार मोहीम राबवली जाते.मार्च २०२५ अखेरीस अवघे तीन दिवस बाकी असताना अर्थमंत्री तथा उपमुख्यमंत्री अजित



पवार यांनी एका कार्यक्रमात शेतकऱ्यांना पीक कर्जे तातडीने भरावीत, असे आवाहन करताना शेतकऱ्यांना कर्जमाफी देण्याएवढी आर्थिक परिस्थिती नसल्याचे जाहीर केले होते.

त्यानंतर शेतकरी अवघ्या काही दिवसांत कर्जे भरायला सुरुवात करीत होते. तोपर्यंत माजी आमदार बच्चू कडू यांनी कर्जमाफीसाठी आंदोलन सुरू केल्यानंतर सरकारमधील मंत्रिमहोदयांनी, 'कर्जमाफीचा विषय राज्य सरकारने सोडून दिला नाही. योग्य वेळ येताच कर्जमाफी दिली जाईल,' असे जाहीर केले. त्यासाठी समिती नेमण्याचे जाहीर केले. त्यामुळे पीक कर्ज वसुलीवर पुन्हा परिणाम होण्याची शक्यता आहे.

जिल्हा बँकेची जूनअखेर कर्जवसुली सुरू आहे. सध्या ६८ टक्के कर्जवसुली सुरू आहे. ९५ टक्क्यांचे उद्दिष्ट होते. कर्जवसुलीसाठी प्रयत्न कायम राहणार आहेत. कर्जमाफीबाबत सांगता येणार नाही. शेतीकर्जाची जून २०२५ अखेरची वसूलपात्र रक्कम २३७२ कोटी ३२ लाख रुपये आहे.

**– शिवाजीराव वाघ, मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा बँक, सांगली**

# सिंधुदुर्ग जिल्ह्यात पावसाचा जोर ओसरला



जिल्ह्यात गेल्या तीन दिवसांपासून सुरू असलेल्या पावसाचा जोर सोमवारी (ता.१६) कमी झाला आहे. अधूनमधून पावसाच्या जोरदार सरी पडत आहेत परंतु त्यानंतर उघडीप देखील मिळत आहे.पावसाचा जोर कमी झाल्याने पुराचा धोका टळला आहे.विस्कळित झालेली अनेक मार्गावरील वाहतूक सुरळीत झाली आहे.

जिल्ह्यात गेल्या तीन-चार दिवसांपासून मुसळधार पाऊस सुरू होता. मात्र रविवारी मध्यरात्रीपासून सिंधुदुर्ग जिल्ह्याला मुसळधार पावसाने झोडपून काढले. त्यामुळे सोमवारी सकाळपासून जिल्ह्यात पूरसदृश स्थिती निर्माण झाली. अनेक मार्ग पाण्याखाली गेल्यामुळे वाहतुकीवर परिणाम झाला.

दुपारी एक वाजेपर्यंत जिल्ह्यात मुसळधार पाऊस सुरू होता. नद्यांच्या पाणीपातळीत प्रचंड वाढ झाली होती. काही नद्या इशारा पातळीजवळ पोहोचल्या होत्या.मात्र एक वाजल्यानंतर पावसाचा जोर काहीसा कमी होण्यास सुरुवात झाली. मंगळवारी सकाळपासून पावसाने उघडीप दिली आहे. अधूनमधून जोरदार सरी पडत असल्या तरी उघडीप देखील मिळत आहे. त्यामुळे पुराचा धोका टळला आहे. अनेक मार्गांवरील पाणी कमी झाल्यामुळे वाहतूक सुरळीत सुरू झाली आहे. विस्कळित झालेले जनजीवन पूर्वपदावर येत असल्याचे चित्र आहे.

# तूर लागवड करताना वेळेचे गणित जूळविण्याची गरज

कडधान्य पिकांपैकी तूर हे मुख्यत्वेकरून खरीप हंगामात घेतले जाणारे महत्त्वाचे पीक आहे. तूर पिकाची सलग तसेच मिश्र पीक म्हणून लागवड केली जाते. तूर पिकाचे अधिक उत्पादन घेण्यासाठी जमिनीच्या प्रकारानुसार योग्य वाणांची निवड, वेळेवर पेरणी, बीजप्रक्रिया, रासायनिक खतांचा शिफारशीप्रमाणे वापर, ओलित व्यवस्थापन, पीक व्यवस्थापन तसेच तण नियंत्रण या महत्त्वाच्या बाबी आहेत.

जमीन : साधारणपणे ६.५ ते ८.५ दरम्यान आम्ल विम्ल निर्देशांक असलेली जमीन लागवडीसाठी योग्य ठरते. मध्यम ते अति काळी तसेच कसदार भुसभुशीत पोताची, पाण्याचा उत्तम निचरा होणारी जमीन तूर पिकासाठी योग्य आहे. तूर पीक घेताना पिकाची फेरपालट होणे अतिशय आवश्यक आहे. त्यामुळे मुख्यतः मर व वांझ रोग तसेच किडींचे प्रमाण कमी राहून उत्पादन वाढीस मदत होते. एकाच जमिनीत दरवर्षी तूर लागवड करणे टाळावे.

पूर्वमशागत : उन्हाळ्यात जमिनीची खोल नांगरणी करून जमीन उन्हामध्ये चांगली तापू द्यावी. शेतातील पीक अवशेष, पालापाचोळा गोळा करून शेताची स्वच्छता करावी. त्यानंतर कुळवाच्या दोन ते तीन पाळ्या देऊन जमीन चांगली भुसभुशीत करावी. शेवटच्या वखराच्या पाळीपूर्वी हेक्टरी १० ते १२ गाड्या चांगले कुजलेले शेणखत किंवा सेंद्रिय खत किंवा कंपोस्ट शेतात पसरवून जमिनीत चांगले मिसळून घ्यावे.

पेरणीची वेळ : साधारणतः ७५ ते १०० मि.मि. पाऊस झाल्यानंतर पेरणी करणे फायदेशीर ठरते. म्हणजेच १५ जून ते १५ जुलै या दरम्यान तूर पिकाची पेरणी करावी. जास्तीत जास्त ३० जुलैपर्यंत पेरणी पूर्ण करावी. कारण, पेरणीस जसजसा उशीर होईल तसे उत्पादनात घट येते. पेरणीस साधारण १५ दिवस विलंब झाल्यास उत्पादनात २५ ते २७ टक्के घट येते.



पेरणीस ३० दिवस उशीर झाल्यास, उत्पादनात ५० ते ५८ टक्के घट होते. पेरणीस सरासरी जितका उशीर होईल तसे प्रतिदिन ८० किलो प्रति हेक्टर प्रमाणे उत्पादनात घट होते.

बीजप्रक्रिया : पेरणीपूर्वी प्रतिकिलो बियाणास, थायरम ३ ग्रॅम किंवा ट्रायकोडर्मा ४ ते ५ ग्रॅम प्रमाणे बीजप्रक्रिया करावी. यामुळे पेरणीनंतर जमिनीतील मुळकुजव्या रोगाच्या जिवाणूंमुळे बियाणांचे तसेच अंकुरलेल्या रोपांचे नुकसान टाळले जाते. तुरीच्या बियाणास चवळी गटाचे रायझोबियम जिवाणू खते लावल्यास उत्पादनात साधारण १० ते २२ टक्के वाढ मिळते.

खत व्यवस्थापन : पेरणीच्या वेळी हेक्टरी २५ किलो नत्र, ५० किलो स्फुरद आणि ३० किलो पालाश याप्रमाणे रासायनिक खतांची मात्रा द्यावी. शिफारशीत खताची मात्रा वेगवेगळ्या खतांद्वारे जसे, ५० किलो युरिया, ३०० किलो सिंगल सुपर फॉस्फेट आणि ५० किलो म्युरेट ऑफ पोटॅश प्रति हेक्टर किंवा १२५ किलो डाय अमोनिअम फॉस्फेट प्रति हेक्टर प्रमाणे देता येईल. माती परिक्षण अहवालानुसार आवश्यकता भासल्यास, २० ते २५ किलो गंधक तसेच १५ किलो झिंक सल्फेट प्रति हेक्टर प्रमाणात द्यावे.

आंतरमशागत : तूर बियाची उगवण झाल्यानंतर साधारणपणे १० ते १५ दिवसांनी विरळणी करून एका ठिकाणी एक किंवा दोन रोपे ठेवावीत. तुरीचे पीक पेरणीनंतर सुरवातीला अतिशय सावकाश वाढते. त्यामुळे पेरणीनंतर साधारण ६० ते ९० दिवस पीक तणमुक्त ठेवणे आवश्यक आहे. त्याकरिता कमीत कमी दोन वेळा निंदणी करावी. पेरणीनंतर २५ ते ३० दिवसांनी पहिली कोळपणी आणि त्यानंतर २० ते २५ दिवसांच्या अंतराने २ ते ३ कोळपण्या कराव्यात.

वाण निवड : तूर पिकाच्या परिपक्वता कालावधीनुसार वाणांचे वर्गीकरण केले जाते. अति लवकर होणारे वाण : १३० दिवसांच्या आत. लवकर परिपक्व होणारे वाण : १३१ ते १५० दिवस. मध्यम लवकर तयार होणारे वाण : १५१ ते १६५ दिवस. मध्यम कालावधीचे वाण : १६६ ते १८५ दिवस. उशिरा परिपक्व होणारे वाण : १८६ दिवसांपेक्षा अधिक. जमीन, पर्जन्यमान आणि पीक पद्धतीचा विचार करून लागवडीसाठी योग्य वाणाची निवड करावी.

# जाणून घ्या निकृष्ट चारा पौष्टिक करण्याची पद्धत

जनावरांचे उत्तम आरोग्य आणि दूध उत्पादनासाठी लागणाऱ्या आवश्यक पोषक घटकांचा प्रमुख स्रोत हिरवा चारा आणि पशुखाद्य हे आहेत. हिरवा चारा टंचाईमुळे जनावरांना वाळलेला चारा द्यावा लागतो. कोरडा चारा म्हणून कडबा, मका, गव्हाचे काड, भात काड, सुकलेले गवत, सोयाबीन कुटार, बाजरीचे सरमाड इत्यादी घटकांचा वापर होतो. परंतु या चाऱ्यांची सकसता कमी असते, यातून पचनीय घटक कमी मिळतात. सुक्या चाऱ्यामध्ये प्रथिने कमी असल्यामुळे जनावर ढेरपोटे (जलोदर) दिसते. अशा सुक्या निकृष्ट चाऱ्यावर योग्य प्रक्रिया करून जनावरांच्या खाद्यात वापरला, तर त्याचा अनुकूल परिणाम दूध उत्पादन आणि जनावरांच्या वाढीवर होतो.

सुक्या चाऱ्यावर प्रक्रिया करण्याची उद्दिष्टे : चारा निकृष्ट दर्जाचा असतो. यामध्ये प्रथिनांचे प्रमाण कमी असते, ही प्रथिने पचण्यास कठीण असतात. तंतुमय पदार्थांचे प्रमाण जास्त असते. तंतुमय पदार्थामध्ये लिग्निन घटक जास्त असल्यामुळे असा चारा पचण्यास कठीण असतो. चाऱ्यामध्ये ऑक्झालेटसारखे घटक असतात, ते क्षार शोषून घेण्यास अडथळा निर्माण करतात. अन्न घटकांच्या कमतरतेमुळे जनावरांच्या दूध उत्पादनावर, शरीर व वजनावर विपरीत परिणाम होतो.

निकृष्ट चाऱ्याची गुणवत्ता वाढविण्यासाठी उपाय:

चाऱ्याची कुट्टी –



चारा कुट्टी न करता दिल्यास जनावरे केवळ सुकी पाने, नरम भाग खाऊन खोडाचा भाग तसाच ठेवतात. त्यामुळे चाऱ्याची नासाडी होते. सुका चारा कुट्टी न करता दिल्यास नासाडीचे प्रमाण ३० टक्के असते. चुका चारा कुट्टी करून दिल्यावर नासाडी फक्त ५ टक्के एवढी होते. कुट्टी केल्यामुळे चारा चावण्यासाठी लागणारी ऊर्जेची बचत होते. चाऱ्याची पाचकता वाढते. कमी जागेत जास्त चारा साठवता येतो, कमी चाऱ्यामध्ये जनावरांचे संगोपन करता येते. निकृष्ट चारा कुट्टी करून काही प्रमाणात उपलब्ध चांगल्या चाऱ्यासोबत मिसळून वापरता येतो.

निकृष्ट प्रतीचा सुका चारा पाण्यात भिजवून देणे : निकृष्ट प्रतीचा सुका चारा जनावरांना खायला रुचकर वाटत नाही. त्यामुळे हा चारा जनावर अधिक प्रमाणात खात नाहीत. चाऱ्याचे १ ते २ सेंमीचे तुकडे करून ५ ते ६ तास भिजत ठेवावेत. त्यानंतर हा चारा खायला दिला तर तो अधिक प्रमाणात खातात. निकृष्ट चाऱ्यातील अपायकारक घटक ऑक्झालेटचे प्रमाण कमी होऊन कॅल्शिअमची उपलब्धता वाढण्यास मदत होते.

गूळ आणि मीठ प्रक्रिया : १०० किलो सुक्या चाऱ्यासाठी १ किलो गूळ आणि १ किलो मीठ प्रति २० ते २५ लिटर पाण्यात मिसळून द्रावण तयार करावे. हे द्रावण सम प्रमाणात फवारावे. हा चारा १२ ते २४ तास झाकून ठेवावा. त्यानंतर जनावरांना द्यावा. या प्रक्रियेमुळे चारा मऊ होतो, चव वाढल्यामुळे हा चारा जनावरे आवडीने खातात.

निकृष्ट चाऱ्यावर युरिया प्रक्रिया :

कुट्टी केलेला चारा सावलीत पसरावा. १०० किलो चाऱ्यासाठी ४ किलो युरिया वापरावा. प्रक्रियेसाठी ४ किलो युरिया ४० लिटर पाण्यामध्ये विरघळून घ्यावा. हे द्रावण सम प्रमाणात १०० किलो कुट्टीवर शिंपडावे. चारा हलवून एकजीव करून घ्यावा. अशाप्रकारे एकावर एक थर देऊन त्यात युरिया मिश्रण मिसळून घ्यावे. प्रत्येक थरात युरिया मिश्रण मिसळून घेतल्यावर चाऱ्यावर दाब देऊन चाऱ्यातील जास्तीची हवा काढून घ्यावी. संपूर्ण चारा जाड प्लास्टिक कागदाने झाकून घ्यावा. जेणेकरून बाहेरील हवा व पाणी आत जाणार नाहीत. २१ दिवस हा चारा हवा बंद ठेवावा कारण यावर व्यवस्थित युरिया प्रक्रिया होते. २१ दिवसांनंतर हा चारा उघडावा. आवश्यक तेवढा चारा बाहेर काढावा. २ ते ३ तास पसरून उघडा ठेवावा, जेणेकरून त्यातील अमोनिया वायू निघून जाईल. त्यानंतर तो खायला द्यावा. शक्य असल्यास चाऱ्यावर गुळाचे पाणी शिंपडावे. त्यामुळे त्याची उपयुक्तता वाढते, तो रुचकर होतो.

## दिन विशेष

### महत्वाच्या घटना

१५७६ : मुघल शासक अकबर आणि महाराणा प्रताप यांच्यात हळदी घाटीच्या युद्धाला सुरुवात झाली.
१७७६ : महाराणा प्रताप व अकबर यांच्यात 'हळदी घाटा' ची सुप्रसिध्द घनघोर लढाई झाली.
१८१५ : वॉटर्लूच्या लढाईत नेपोलियनचा दारुण पराभव
१८३० : फ्रान्सने अल्जीरिया ताब्यात घेतले.
१९०८ : फिलीपाइन्स विश्वविद्यालाची स्थापना झाली.
१९३० : चीनचा सम्राट डोवागर लोंग्यू याने देशातील सर्व परदेशी व्यक्तींना ठार करण्याचा हुकूम दिला.
१९४६ : डॉ. राममनोहर लोहिया यांनी गोव्याच्या मडगाव शहरातून गोवा मुक्तीचे रणशिंग फुंकले. या घटनेच्या स्मरणार्थ पणजींतील एका रस्त्याला '१८ जून रस्ता' असे नाव देण्यात आले आहे.
१९५६ : रँग्लर र. पु. परांजपे पुणे विद्यापीठाचे दुसरे कुलगुरू झाले.
१९८१ : जनावरांमधे आढळणार्या लाळ्या-खुरकुत रोगावरील पहिली जनुकीय लस विकसित झाली.
१९८३ : अंतराळवीर सैली राइड या अंतराळात प्रवास करणाऱ्या पहिल्या अमेरिकन महिला आहेत.
१९८७ : एम. एस. स्वामिनाथन यांना प्रथम जागतिक अन्न पुरस्कार (वल्ड फूड) मिळाला.
२००६ : कॅझसॅट या कझाकस्तानच्या पहिल्या उपग्रहाचे प्रक्षेपण.
२००९ : अमेरिकन अंतराळ संस्था नासाने चंद्रावर पाण्याचा शोध घेण्यासाठी विशेष उपग्रह पाठविला.
२०१३ : भारताच्या उत्तराखंड राज्यात मुसळधार पाउस पडून मंदाकिनी व अलकनंदा नद्यांना महापूर. शेकडो मृत्युमुखी, हजारो बेघर.
२०१७ : किदम्बी श्रीकांतला इंडोनेशिया सुपर सीरिजचे जेतेपद भारतीय बॅडमिंटनपटू किदम्बी श्रीकांतने इंडोनेशिया सुपर सीरिज प्रिमिअरच्या पुरुष एकेरीत जेतेपद पटकावले. असे करणारा तो पहिला भारतीय खेळाडू ठरला आहे.
२०१७ : भारतीय फुटबॉल संघाचा कर्णधार सुनील छेत्रीने समकालीन खेळाडूंमध्ये सर्वाधिक गोल करणाऱ्यांच्या यादीत चौथ्या स्थानावर झेप घेतली आहे.

### जन्मदिवस । जयंती । वाढदिवस

१८१७ : राजपूत नेपाळ शासक तसचं, नेपाळचे पहिले पंतप्रधान व राणा राजवंशाचे संस्थापक जङ्गबहादुर राणा यांचा जन्मदिन.
१८८७ : थोर भारतीय स्वातंत्र्य सेनानी, राजकारणी, शिक्षक, राजनीतिज्ञ, तसचं, बिहार राज्याचे माजी उपमुख्यमंत्री व वित्तमंत्री डॉ.अनुग्रह नारायण सिन्हा यांचा जन्मदिन.
१८९९ : शंकर त्रिंबक तथा 'दादा' धर्माधिकारी स्वातंत्र्यसेनानी व समाजसुधारक (मृत्यू: १ डिसेंबर १९८५)
१९११ : कमला सोहोनी पहिल्या भारतीय महिला शास्त्रज्ञ (मृत्यू: ८ सप्टेंबर १९९७)
१९३१ : के. एस. सुदर्शन प्रखर राष्ट्रवादी व राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे ५ वे सरसंघचालक (मृत्यू: १५ सप्टेंबर २०१२)
१९३१ : ब्राझील देशाचे समाजशास्त्रज्ञ, प्राध्यापक आणि राजकारणी तसचं, ब्राझील देशाचे माजी राष्ट्रपती फर्नांडो हेन्रिक कार्डोसो यांचा जन्मदिन.
१९३४ : भारतीय वंशीय संगणक वैज्ञानिक, बंगळुरू येथील भारतीय विज्ञान संस्थान, संगणक विज्ञान विभागाचे माजी प्राध्यापक ई.वी. कृष्णमूर्ती यांचा जन्मदिन.
१९४२ : पॉल मॅकार्टनी संगीतकार, संगीतसंयोजक, वादक, गीतलेखक, 'बीटल्स'चा सदस्य
१९४२ : थाबो म्बेकी दक्षिण अफ्रिकेचे राष्ट्राध्यक्ष
१९६५ : उदय हुसेन सद्दाम हुसेन यांचा मुलगा (मृत्यू: २२ जुलै २००३)
१९८६ : फ्रेंच व्यावसायिक टेनिसपटू रिचर्ड गॅब्रिएल सायर गैस्के यांचा जन्मदिन.
१९८७ : इंग्लंड देशाचे महान क्रिकेटपटू मोईन अली यांचा जन्मदिन.
१९९४ : युवा भारतीयह टेनिसपटू प्रार्थना गुलाबराव ठोंबरे यांचा जन्मदिन.

### मृत्यू । पुण्यतिथी । स्मृतिदिन

१८५८ : मणिकर्णिका तांबे ऊर्फ 'राणी लक्ष्मीबाई' झाशीची राणी इंग्रजांचा पाठलाग टाळण्याच्या प्रयत्नात झालेल्या चकमकीत मृत्यूमुखी पडल्या (जन्म: १९ नोव्हेंबर १८२८)
१९०१ : रामचंद्र भिकाजी गुंजीकर 'मोचनगड' या मराठीतील पहिल्या ऐतिहासिक कादंबरीचे लेखक आणि 'विविध ज्ञानविस्तार' मासिकाचे संपादक (जन्म: १० एप्रिल १८४३)
१९०२ : सॅम्युअल बटलर इंग्लिश लेखक (जन्म: ४ डिसेंबर १८३५)
१९३६ : मॅक्झिम गॉर्की रशियन लेखक (जन्म: २८ मार्च १८६८)
१९५८ : डग्लस जार्डिन इंग्लिश क्रिकेटपटू (जन्म: २३ आक्टोबर १९००)
१९६२ : जे. आर. तथा नानासाहेब घारपुरे पुण्याच्या विधी महाविद्यालयाचे संस्थापक आणि प्राचार्य, नामवंत विद्वान (जन्म:)
१९७४ : सेठ गोविंद दास स्वातंत्र्यसैनिक, लोकसभेचे हंगामी सभापती, साहित्यिक (जन्म: १६ आक्टोबर १८९६)
१९९९ : श्रीपाद रामकृष्ण काळे ५२ कादंबर्या आणि ११०० हुन अधिक कथा लिहिणारे साहित्यिक, कथा आणि कादंबरीकार (जन्म: )
२००३ : जानकीदास हिन्दी चित्रपटातील चरित्र अभिनेते (जन्म: १९१०)
२००५ : भारतीय क्रिकेटपटू मुश्ताक अली यांचे निधन. (जन्म: १७ डिसेंबर १९१४)
२००९ : उस्ताद अली अकबर खाँ तथा खाँसाहेब मैहर घराण्याचे जागतिक कीर्तीचे सरोदवादक, पद्?मविभूषण (१९६९), मॅकआर्थर फेलोशिप, संगीत नाटक अकादमी फेलोशिप, नॅशनल हेरिटेज फेलोशिप (जन्म: १४ एप्रिल१९२२ शिबपूर, कोमिल्ला, बांगला देश)
२०२० : लच्छमानसिंग लेहल मेजर-जनरल वीर चक्र, परम विशिष्ठ सेवा (जन्म: ९ जुलै १९२३)
२०२१ : मिल्खा सिंग द फ्लाइंग शीख, धावपटू पद्मश्री (जन्म: ८ ऑक्टोबर १९३५)

# पुरस्कार देणे म्हणजे केलेल्या कामाबद्दल कौतुकाची थाप : भास्कर पेरे

## सरपंच अर्चना पाटील व अँड राज पाटील यांना पुरस्कार प्रदान

वडवणी

आदर्श पुरस्कार देणे म्हणजे केलेल्या कामाबद्दल शाब्बासकीची व कौतुकाची पाटीवर थाप देणे हे होय. वडवणी तालुक्यातील तिगाव येथील सरपंच सौ.अर्चना पाटील व लढा दुष्काळाशी फाउंडेशनचे संस्थापक अध्यक्ष अँड राज पाटील यांनी गावासाठी विविध विकास कामे केलेली आहे.त्यांच्या कामाची पावती म्हणून त्यांना स्वराज्य सरपंच संघ महाराष्ट्र प्रदेश यांनी बीड जिल्ह्यातून आदर्श सरपंच म्हणुन त्यांची निवड केली आहे.तालुक्यात व जिल्हाभरातील सरपंचांनी आपल्या गावासाठी चांगले उत्कृष्ट काम करावे जेणेकरून त्यांनाही पुढील काळात पुरस्कार मिळू शकतात.पुरस्कार मिळाला तर तुम्हाला गावासाठी व देशासाठी अजून चांगली कामे करण्यासाठी प्रेरणा स्फूर्ती नक्कीच मिळेल असे गोरोदगार आदर्श सरपंच भास्करराव पेरे पाटील यांनी व्यक्त केले.

स्वराज्य सरपंच संघ महाराष्ट्र प्रदेश यांच्या वतीने आदर्श सरपंच सन्मान सोहळा २०२५ राज्यस्तरीय पुरस्कार सोहळा, सन्मान सरपंचाचा गावच्या मुख्यमंत्र्याचा,या कार्यक्रमात बीड जिल्ह्यासह राज्यात वृक्ष लागवड चळवळीचे जनक ओळख असणारे अँड. राज पाटील यांना वृक्ष संवर्धन मित्र म्हणून तर तिगावच्या ऊच्च शिक्षीत समपंच अर्चनाताई पाटील यांना आदर्श सरपंच म्हणून पुरस्कार रविवार दि १५ रोजी माता अहिल्या नगरीत विविध मान्यवरांच्या उपस्थितीत शाल श्रीफळ व स्मृतिचिन्ह देऊन सन्मानित करण्यात आले.अहिल्यानगर येथील स्वराज्य सरपंच सेवा संघ महाराष्ट्र प्रदेश स्तरावरील संस्था असून गेल्या अनेक वर्षांपासून विविध क्षेत्रात उल्लेखनीय कामगिरी करणाऱ्या मान्यवरांना पुरस्कार देऊन गौरव करते.तर यावर्षीचा आदर्श सरपंच म्हणून वडवणी तालुक्यातील तिगांवच्या कर्तव्यदक्ष आदर्श सरपंच सौ. अर्चनाताई राज पाटील यांना घोषित करण्यात आला आहे. तर त्यांचे पती समाजसेवक व लढा दुष्काळाशी या फाउंडेशनचे सर्वासर्वे संस्थापकीय अध्यक्ष अँड. राज पाटील हे देखील गेल्या अनेक वर्षांपासून बीड जिल्ह्यासह महाराष्ट्रात वृक्ष लागवडीच्या माध्यमातून सामाजिक कार्य करत आहेत. लोक सहभागातुन जलयुक्त शिवार कार्यक्रमांतर्गत नदी खोलीकरण रुंदीकरण पाणी आडवा पाणी जिरवा या मधून गाव दुष्काळ मुक्त व टँकर मुक्त होणार आहे.याच कार्याची दखल घेऊन स्वराज्य सरपंच सेवा संघ महाराष्ट्र राज्य यांच्या वतीने रविवार दिनांक १५ जून वार रविवार रोजी अहिल्यानगर येथील माऊली संकुलन सभागृह येथे पाटोदा गावचे आदर्श सरपंच भास्कर पेरे पाटील यांच्या हस्ते तीगांवच्या पाटील दाम्पत्यांचे यथोचित सत्कार करून स्मृतिचिन्ह देत सन्मानित करण्यात आले आहे.सर्व सन्माननीय पदाधिकारी सरपंच सेवा संघ यांच्या सहकार्याने पार पडला




गावातील विविध विकास कामे करण्यासाठी गाव आदर्श करण्यासाठी गावातील सर्वांचे सहकार्याचे आवश्यकता असते ते माझ्या गावातील लहान थोर महीला पुरुष तरुण युवक सर्वांनी सहकार्य केलेले आहे. हा पुरस्कार मिळाल्याने गावचा विकास करण्यासाठी नवीन ऊर्जा प्राप्त झालेली आहे.एवढ्यावरच न थांबता पुढे जास्तीत जास्त विकास कामे करायचे आहेत.

अँड राज पाटील(लढा दुष्काळाशी फाउंडेशन संस्थापक अध्यक्ष)


## संत एकनाथ महाराजांच्या पालखीचे २५ जून रोजी गारमाथा आगमन

पाटोदा। प्रतिनिधी

आषाढी एकादशीच्या निमित्त विठ्ठल भेटीसाठी दरवर्षी पैठण येथे निघालेली संत एकनाथ महाराज यांची पालखी बुधवार दिनांक २५ जून रोजी पाटोदा तालुक्यात मुक्कामी दाखल होणार आहे टाळ मृदुंगाच्या गजरात विठ्ठल नामाचा जेघोष करीत अत्यंत शिस्तीत पंढरपूरच्या दिशेने निघालेली संत एकनाथ महाराजांची पालखी हजारोच्या वारकरी जनसमुदाय सहभागी झालेला असून त्यांच्या स्वागताची तयारी पाटोदा शहरापासून दहा ते बारा किलोमीटर अंतर असलेले गारमाथा करण्यात आले आहे पाटोदा नगरपंचायत पंचायत समिती पोलीस प्रशासन महसूल प्रशासन कार्यतत्पर राहण्याचे आदेश देण्यात आले आहेत या संदर्भात उपविभागीय अधिकारी व सीमा शेख तहसीलदार दत्तात्रय निलवड मुख्याधिकारी अभय कुमार जोशी नगर अध्यक्ष प्रतिनिधी राजू भैया जाधव यांनी मंगळवारी १७ जून रोजी आढावा घेतला आहे प्रशासनाकडून पालखी सोहळ्यात सहभागी वारकऱ्यांची मोफत आरोग्य तपासणी केली जाणार आहे वारकऱ्यांच्या चहा पाणी नाश्त्याची सोय केली जाणार आहे त्याप्रमाणे इतरही मूलभूत सुविधा पूर्तता प्रशासनाकडून केली जाणार आहे पाटोदा तालुक्यातील भाविक भक्तांची दर्शनासाठी होणार असलेली संभाव्य गर्दी विचार करता प्रशासनाने सुरक्षेच्या दृष्टीने देखील नियोजन पूर्ण करण्यात आले आहे प्रशासनाकडून उपविभागीय अधिकारी व सीमा शेख मुख्याधिकारी अभय कुमार जोशी हिगार माते वसंत रे एकनाथ महाराजांच्या पालखीचे पाटोदा तालुक्यात स्वागत करणार आहेत.

दरम्यान पालखी पाटोदा शहराकडे येत असताना त्या पालखी सोहळ्यात सहभागी होत असलेली अधिकारी पायी चालणार आहेत एकंदरीत संत एकनाथ महाराजांच्या पालखीचे स्वागताची तयारी शासनाने केली असून पथदिवे दुरुस्ती पाणीपुरवठ्याचे नियोजन रस्त्यावरील खड्डे बुजवण्याचे काम केले जात आहे या आढावा बैठकीदरम्यान पाटोदा शहरात पैठण पूर्व मार्गावरील रस्त्याच्या फुलाच्या संदर्भात तीव्र नाराजी व्यक्त करीत तहसीलदार दत्तात्रय निरवाडे यांनी महामार्ग विभागाचे अधिकारी तंत्राटदार यांना धारेवर धरले त्यांनी पुलाचे व रस्त्याच्या दुरुस्तीचे काम करण्याच्या सूचना देण्याच्या महामार्ग अधिकारी व कंत्राट यांना दिल्या.

## उसतोड महिलांच्या आरोग्याचा अनुसुचित जाती जमाती समितीकडून आढावा



बीड । प्रतिनिधी

ऊसतोड कामगार महिलांच्या आरोग्याबाबत असलेल्या विविध समस्यांचा आज अनुसूचित जाती जमाती समितीचे सदस्य गोरख लोखंडे यांनी बीड येथे एका बैठकीत आढावा घेतला. बीड येथील पोलीस अधीक्षक यांच्या कार्यालयात झालेल्या बैठकीत त्यांनी याबाबत आढावा घेताना ऊसतोड महिला कामगार महिलांची ऊसतोडणीस जाण्यापूर्वी व तोडणी वरून परत आल्यानंतर अशा दोन्ही वेळा आरोग्य तपासणी करण्याच्या सूचना दिल्या.

अवैधरित्या महिलांचा गर्भपात केला जातो अशा तक्रारी प्राप्त झाल्या आहेत असे आढळून आल्यास त्याबाबत गुन्हा दाखल करण्यात यावा अशाही सूचना त्यांनी यावेळी दिल्या. आरोग्य विभागाच्या अधिकाऱ्यांनी वेळोवेळी अचानकपणे खाजगी रुग्णालयांची तपासणी करावी तसेच सर्व खाजगी रुग्णालयांमध्ये तक्रार करण्यासाठीचा टोल फ्री क्रमांक दर्शनी भागात लावण्यात यावा असेही ते म्हणाले. ग्रामपंचायत गर्भवती महिलांची माहिती आरोग्य विभागाने आशा सेविका तसेच अंगणवाडी सेविका यांच्या माध्यमातून गोळा करावी व यापुढील काळात अवैधपणे गर्भपात होणार नाहीत याची खबरदारी घ्यावी असेही लोखंडे यांनी यावेळी सांगितले.आज झालेल्या या बैठकीत नवनीत कौवत पोलीस अधीक्षक बीड, सचिन पांडकर अप्पर पोलीस अधीक्षक बीड, पूजा पवार प्रभारी पोलीस स्टेशन पिंपळनेर, डॉ संतोष शहाणे अतिरिक्त जिल्हा शिल्लचिकित्सक बीड, तत्त्वशील कांबळे सामाजिक कार्यकर्ते बीड, गोरे साहेब समाज कल्याण बीड नितीन पतंगे समाज कल्याण बीड आदींची उपस्थिती होती.

## थोडक्यात



### डॉ विक्रमसिंह कपूर यांचा सत्कार

बीड । प्रतिनिधी

बार्शी रोड बीड येथील वीर शिरोमणी महाराणा प्रतापसिंह सामाजिक प्रतिष्ठान बीडचे अध्यक्ष डॉ विक्रम सिंह कपूर यांची अध्यक्ष म्हणून निवड झाली या निम्मित त्याच्या मित्र परिवाराने सत्कार केला. सत्कार करताना नितीन धांडे, झुंजार सेठ धांडे ,मुकुंद भालेकर, सखाराम देवकर, बाबा पंडित, अंकुश आगळे, सुरेश तात्या शेटे, अमोल कुमकर ,अनिल डाके, बाबुराव घोरपडे, प्रभू सिंह ठाकुर ,लक्ष्मण सिंह ठाकुर, भिकू शिंदे, शिवाजी सुसकर, मधुकर धांडे ,शेख सलीम (लालू) नवनाथ तपासे, (माऊली )सुंदर भोसले, गणेश तपासे, पन्हाळकर दाजी ,ओम प्रकाश सिंह कश्यप, सचिन ठोंबरे ,मोती सिंह राजपूत, रमेश गंगाधरे, शरद डहाळे, मन्यारी पटेल ,भगवानराव चव्हाण, गोविंद धांडे ,युवराज गुरखुदे मनोज परदेशी व मित्र मंडळ यांच्या सह उपस्थित होते.

### बीड ते पंढरपूर आषाढी वारी दिव्यरथ पालखी सोहळा

बीड । प्रतिनिधी

संतश्रेष्ठ श्री ज्ञानेश्वर माऊली आळंदी देवाची यांचे आजोबा ब्रह्मलीन गोविंद पंत महाराज यांचा आषाढी दिव्यरथ पालखी सोहळा दिनांक जून , २०२५ बुधवारी रोजी बीडहून प्रस्थान करणार आहे. हा आषाढी पायी वारी पालखी सोहळा मजल दर मजल करत श्रीक्षेत्र पंढरपूर कडे मार्गक्रमण करत हरिनामाच्या गजरात व पांडुरंगाच्या भक्तीत तल्लीन होऊन भाविक भक्त सहभागी होणार आहेत. प्रत्येक मुक्कामाच्या ठिकाणी रात्री हरी जागर व किर्तन सेवा संपन्न होणार आहे .आषाढी वारी निमित्त या पायी वारी सोहळ्यामध्ये जास्तीत जास्त संख्येने भाविक भक्तांनी सहभागी होऊन वारीचा आनंद घ्यावा व या पायीवारी पालखी सोहळ्यात सहभागी व्हावे असे आवाहन संस्थांचे अध्यक्ष व दिंडी प्रमुख हभप सुग्रीव महाराज डाके ,श्रीमंत (अण्णा) वाघमारे, राधाकृष्ण वाव्हळ महाराज यांनी कळविले आहे.

### राजरत्न कापसेला ब्राँझ पदक

बीड । प्रतिनिधी




येथील देवगिरी प्रतिष्ठान संचलित तुलसी इंग्लिश स्कूल, बीडचा विद्यार्थी राजरत्न कापसे याने मुंबई येथील अंधेरी स्पोर्ट्स कॉम्प्लेक्स येथे नुकत्याच पार पडलेल्या २३ व्या इंटरनॅशनल स्पोर्ट्स जीत कुणे-डो कराटे स्पर्धा २०२५ मध्ये उत्कृष्ट कामगिरी करत ब्राँझ मेडल मिळवले आहेया स्पर्धेत भारतासह ५ ते ६ आंतरराष्ट्रीय संघांनी सहभाग नोंदवला होता. कठोर मेहनत, आत्मविश्वास आणि प्रबळ जिद्दीच्या जोरावर राजरत्नने हे यश मिळवले. ही स्पर्धा रविवारी,१५ तारखेला पार पडली. या यशामागे बीड जिल्ह्याचे प्रमुख कराटे प्रशिक्षक आणि जीत कुणे-डो असोसिएशनचे सचिव ॲड. नितीन पवार यांचे तसेच महिला प्रतिनिधी ॲड.आरती सतकर मॅडम यांचे मोलाचे मार्गदर्शन लाभले.राजरत्नच्या यशाबद्दल शाळेचे संस्थापक अध्यक्ष प्रा. प्रदीप रोडे सर, प्राचार्या सौ. उमा जगतकर मॅडम, तसेच सर्व शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांनी दिलेल्या अभिनंदनामुळे त्याला खूप आनंद आणि प्रोत्साहन मिळाले आहे.


**तालुका दंडाधिकारी तथा तहसीलदार**

E–mail id :–tahshildarambad@gmail.com

दूरध्वनी क्रमांक:०२४८३२७५०२६

जा. क्र.२०२५ /सेतु/कावी/२६, दिनांक/०६/२०२५

विषय:जाहीर प्रगटन प्रसिद्ध करणे बाबत
(जन्ममृदेची नोंदी सुधारणा अधिनियम२०२३)

अर्जदार श्रीमान / श्रीमती विठ्ठल बापूराव शिंदे रा. भनंग जळगाव ता. अंबड जि. जालना यांनी तहसील कार्यालय अंबड येथे त्यांच्या नामे कल्पना विठ्ठल शिंदे मुलगी च्या दि.२०/१२/१९९४ जन्म मृत्यू नोंद घेणे का मी अर्ज सादर केला आहे. त्या अनुषंगाने संबंधित अर्जदार विरुद्ध ग्रामपंचायत कार्यालय भंनग जळगाव नगरपंचायत कार्यालय भनंग जळगाव यांचे जाहीर प्रगटन आपल्या दैनिकात प्रसिद्ध करण्यासाठी पाठवीत आहोत. तसेच मा. सचिव (१) महाराष्ट्र शासन यांच्याकडील शा. निर्णय जमृनो २५२५(ई. ऑ. ९९११८१) प्र. क्र.२२/कु. क दि.१२/०३/२०२५ रोजीच्या शासन निर्णयामध्ये जाहीर प्रगटन हे अर्जदाराच्या खर्चाने प्रसिद्ध करावे असे नमूद केलेले आहे.
त्यामुळे संबंधित अर्जदार यांच्याकडून जाहीर प्रगटन प्रसिद्ध करणे कामीचा खर्च स्वीकारण्यात यावा. तसेच जाहीर प्रगटन प्रसिद्ध करण्याबाबतची कोणतीही जबाबदारी या कार्यालयाची राहणार नाही. व प्रसिद्ध केलेली जाहीर प्रगटन बाबतचे दोन पेपर या कार्यालयास पाठविण्यात यावे.

**सोबत: जाहीर प्रगटन**

स्वाक्षरीत
**तहसीलदार तथा**
कार्यकारी दंडाधिकारी, अंबड



**जाहीर प्रगटन**

**मा. श्रीमती वंदना. व्ही. जोशी दिवाणी न्यायाधीश, व. स्तर, बीड यांच्या न्यायालयात**

**किरकोळ दिवाणी अर्ज क्र. ९१३ /२०२५**

**मार्फत अॅड तावरे बी.एन.**

**यशराज अशोक रोहिटे अ. पा.क वडील अर्जदार क्र.२ वि. निरंक**

अर्जदार: १) यशराज पि. अशोक रोहिटे वय ११ वर्षे धंदा. शिक्षण रा. आहेर वडगाव ता.जि.बीड अज्ञान, अ.पा.क. वडील अर्जदार क्र.२

२)अशोक पि. जालिंदर रोहिटे
वय ४४ वर्षे धंदा शेती, रा. आहेर वडगाव ता.जि. बीड
गैरअर्जदारनिरंक

प्रकरण :भारतीय वारसा कायदा१८२७ चे कलम २ , आन्वये वारस प्रमाणपत्र मिळणे बाबत ज्याअर्थी अर्जदार यांनी राही भ्र.अशोक रोहिटे यांचे वारस प्रमाणपत्र मिळणे बाबत या न्यायालयात अर्ज दाखल केला आहे. मयत राही भ्र अशोक रोहिटे ह्या दिनांक २५ /०४/२०२४ रोजी राहते घरी मौजे आहेरवडगाव ता. जि. बीड येथे मयत झालेल्या आहेत. अर्जदार क्र.१ हा मयताचा मुलगा असून अर्जदार क्र.२ मयताचे पती आहेत. अर्जदाराशिवाय मयताचे इतर कोणीही वारस नाहीत. अर्जदाराचे असे म्हणणे आहे की, शासकीय व निमशासकीय कामासाठी वारस प्रमाणपत्राची आवश्यकता आहे म्हणून सदरचा अर्ज या न्यायालयात दाखल केला आहे. त्याअर्थी सर्व जनतेस कळविण्यात येते की सदरील अर्जदार सदरहू मयताचे वारस नव्हेत असे कोणास समजविण्याची असेल तर त्यांनी हे प्रगटन प्रसिद्ध झाल्यापासून तीस दिवसाच्या आत त्यांनी कोर्टात हजर होऊन आपल्या हरकती कळवाव्यात आणि लेखावरून असे कळविण्यात येते की जर सदरहु न्यायालयात सदरहू अर्जदार यांचे हक्काबद्दल लागलीच पुरावा घेऊन त्यांचा हक्क शाबीत दिसल्यास त्यांना सदरहु मयत नामे राही भ्र. अशोक रोहिटे रा. आहेर वडगाव ता.जि. बीड यांचे अर्जदार हेच मयताचे कायदेशीर वारस म्हणून घोषित करून अर्जदारास वारसाचे प्रमाणपत्र देण्यात येईल याची नोंद घ्यावी. सदर प्रकरणात पुढील तारीख २१/०७/२०२५ आहे

आज दिनांक १७/०६/२०२५ रोजी माझे सहीने व न्यायालयाच्या शिक्क्याने दिले. फ

स्वाक्षरित
**क लिपीक**

शिक्का

आदेशावरून
स्वाक्षरित
**अधिक्षक**
सह दिवाणी न्यायालय व. स्तर बीड


## लिंबागणेशकरांनी १८ जून शेतकरी पारतंत्र्य दिवस पाळला

### परिशिष्ट ९ शेतकरी विरोधी कायदे रद्द करा

लिंबागणेश । प्रतिनिधी

१५ ऑगस्ट १९४७ रोजी देश स्वतंत्र झाला.२६ जानेवारी १९५० रोजी राज्यघटना स्वीकारली गेली.या राज्यघटनेत सर्वांना मुलभूत अधिकार देण्यात आले होते.मात्र अवघ्या दिड वर्षात १८ जुन १९५१ ला निर्वाचित नव्हे तर काळजीवाहू हंडामी सरकारने पहिली घटना दुरुस्ती खरंतर घटना बिघाड करत घटनेत नसलेले परीशिष्ट ९ जोडण्यात आले.अनुच्छेद ३१ (अ)व (ब) नुसार परीशिष्ट ९ मधील समाविष्ट कायद्यांच्या विरोधात न्यायालयात जाता येणार नाही अशी तरतूद आहे.आज परिशिष्ट ९ मध्ये २८४ कायदे असुन त्यापैकी २५० हुन आधिक कायदे थेट शेतकऱ्यांशी निगडित आहेत.ही घटना दुरुस्ती शेतकऱ्यांना कर्दनकाळ ठरली असुन तिचा परीणाम म्हणून लाखों शेतकऱ्यांना आत्महत्या करावी लागत आहे.

हा घटना बिघाड १८ जुन १९५१ रोजी करण्यात आला यांच्या निषेधार्थ किसान पुत्र आंदोलनाचे प्रणेते अमर हबीब यांच्या मार्गदर्शनात डॉ.गणेश ढवळे लिंबागणेशकर यांच्या नेतृत्वाखाली २०१७ पासुन ग्रामस्थांच्या वतीने १८ जुन ''शेतकरी पारतंत्र्य दिवस''पाळण्यात येतो. आज दि.१८ बुधवार रोजी किसान पुत्र आंदोलनाचे प्रणेते अमर हबीब यांच्या मार्गदर्शनाखाली किसान पुत्र आंदोलक डॉ.गणेश ढवळे यांच्या नेतृत्वाखाली ग्रामपंचायत कार्यालयात दंडाला काळ्या फिती लावून व शेतकरी विरोधी कायद्यांची माहिती ग्रामस्थांना देत शेतकरी पारतंत्र्य दिवस पाळण्यात आला. शेतकऱ्यांसाठी गळफास ठरणारे त्यांच्या आत्महत्यांना कारणीभूत ठरलेले १)कमाल शेतजमीन धारणा(सीलिंग)२) आवश्यक वस्तू कायदा ३) जमीन अधिग्रहण कायदा ३ प्रमुख शेतकरी विरोधी कायदे रद्द करण्यात यावेत अशी मागणी जिल्हाधिकारी बीड यांच्या मार्फत राष्ट्रपती, पंतप्रधान, केंद्रीय कृषिमंत्री, राज्यपाल, मुख्यमंत्री, कृषीमंत्री, विभागीय आयुक्त यांना ईमेल द्वारे करण्यात आली.यावेळी सरपंच बालासाहेब जाधव, उपसरपंच बाळकृष्ण थोरात, पंचायत समिती माजी सदस्य राजेभाऊ गिरे, भिम टायगर ग्रुप बीड जिल्हाध्यक्ष रविंद्र निर्मळ, ग्रामपंचायत सदस्य शेख समीर, श्रीहरी निर्मळ, रमेश गायकवाड,दामु आण्णा थोरात, अशोक जाधव अर्जुन घोलप, अँड . गणेश वाणी, पांडुरंग वाणी,विक्रांत वाणी, संतोष भोसले, संतोष वाणी, नामदेव वाणी, शिवाजी शिंदे, विक्रांत दाभाडे, दादा गायकवाड,राजेंद्र वायभट, लेनाजी गायकवाड,राजेंद्र आगवान, दादाराव येडे, तुषार गायकवाड , प्रमोद निर्मळ,बापु थोरात,दिपक थोरात,कचरू निर्मळ आदी शेतकरी आणि पत्रकार हरीओम क्षीरसागर आदि ग्रामस्थ सहभागी झाले होते.



शेतकरी पारतंत्र्यात कसा?

देशातील अन्य सर्व नागरिकांना आपल्यावरील अन्यायाच्या विरोधात कोर्टात दाद मागता येते परंतु शेतकऱ्यांना नाही.प्रत्येक उत्पादक आपल्या मालाची किंमत स्वतः ठरवू शकतो परंतु शेतकऱ्यांना आपल्या मालाची किंमत ठरवता येत नाही.कोणाच्या मालमत्तेला कोणीही धक्का लावु शकत नाही.सरकार सुद्धा नाही.पण सरकार शेतकऱ्यांच्या जमिनी काढून घेऊन ईतर कोणालाही देऊ शकते.आपल्या उत्पादन साधनाचा आकार किती लहान किंवा मोठा असावा,हे ठरविण्याचा अधिकार संविधानाने प्रत्येक नागरिकाला दिला आहे परंतु तो आधिकार शेतकऱ्यांना नाही.मग शेतकरी स्वतंत्र कसा?? हा खरा प्रश्न आहे. त्यामुळे आजही शेतकरी पारतंत्र्यात आहे.


**टीसी हरवला आहे**

**बळीराम रतन चांदर या नावाचा इयत्ता १२ वी पास चा गेवराई जातेगाव बस प्रवासात हरवला आहे मिळाल्यास खालील संपर्क संपर्क साधावा संपर्क ७०३००३०४५१**



**टीसी हरवला आहे**

**हरेकृष्णा गोरख ढाकणे नावाचा श्री विठ्ठल माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय सारणी (सां) या शाळेतून इयत्ता १२ वी पासचा टि.सी. दि.०८ जुन २०२५ रोजी सारणी (सां) ते केज प्रवासादरम्यान हरवला आहे. कोणास सापडल्यास खालील मो.नं.वर संपर्क साधावा.**

**मो.नं.- ९३७०८७७८११**


## राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाच्या सर्कल अध्यक्ष आणि कार्याध्यक्षांच्या निवडी

### राजेभाऊ फड यांच्या हस्ते नवनियुक्त पदाधिकाऱ्यांना नियुक्तीपत्र बहाल

परळी । प्रतिनिधी

राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाने आगामी निवडणुका लक्षात घेता पक्ष आणि संघटन बांधणीच्या कामाला वेग आणला आहे. पक्षाचे सर्वेसर्वा आणि देशाचे नेते शरदचंद्र पवार तसेच पक्षाचे प्रदेशाध्यक्ष जयंत पाटील यांच्या मार्गदर्शक सूचनांना अनुसरून आणि जिल्हाध्यक्ष राजेंद्र मस्के यांच्या अनुमतीने परळी तालुक्यातील जिल्हा परिषद सर्कल अध्यक्ष आणि कार्याध्यक्ष यांच्या नव्या निवडी जाहीर करण्यात आल्या आहेत. पक्षाच्या शहरातील मध्यवर्ती जनसंपर्क कार्यालयात पक्षाचे नेते राजेभाऊ फड यांच्या हस्ते सर्व नवनियुक्त पदाधिकाऱ्यांना निवडीचे पत्र देण्यात आले. यावेळी त्यांनी सर्वांचे अभिनंदन करून भावी वाटचालीस शुभेच्छा दिल्या.



राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्ष आगामी स्थानिक स्वराज्य संस्था निवडणुकीच्या अनुषंगाने वेगाने कामाला लागला असून, पक्ष आणि संघटन बांधणीला गती देण्यात आली आहे. यावेळी पक्षाचे नेते राजेभाऊ फड, तालुकाध्यक्ष बाबासाहेब शिंदे पाटील, ज्येष्ठ नेते उत्तम दादा माने, ओबीसी सेलचे तालुकाध्यक्ष एच.यू.फड, मुक्ताराम गवळी, यांच्यासह अनेकांची उपस्थिती होती.पक्षाच्या वरिष्ठ नेत्यांच्या मार्गदर्शक सूचनांना अनुसरून टप्प्या टप्प्याने निवडी जाहीर करण्यात येत आहेत. बुधवार, दि.१८ जून रोजी परळी वैजनाथ तालुक्यातील जिल्हा परिषद सर्कलचे अध्यक्ष तथा कार्याध्यक्ष यांच्या निवडी करण्यात आल्या. यामध्ये दादाहरी वडगाव सर्कल अध्यक्षपदी बब्रुवान आघाव, सर्कल कार्याध्यक्षपदी शिवाजी शिंदे, पिंपरी बुद्रुक सर्कल अध्यक्षपदी दत्ता चव्हाण तर कार्याध्यक्षपदी प्रकाश मुंडे, सिरसाळा सर्कल कार्याध्यक्षपदी बाळासाहेब पवार तर अध्यक्षपदी सय्यद अजमत सय्यद आबेदाली, नागापूर सर्कल कार्याध्यक्षपदी विलास तेलंग तर अध्यक्षपदी पंडित मुंजाजी भोसले यांच्या निवडी करण्यात आल्या तर तालुक्यातील सर्वात मोठ्या असलेल्या सिरसाळा शहराच्या अध्यक्षपदी फिरोज शेख यांची निवड घोषित करण्यात आली आहे. सर्व नवनियुक्त पदाधिकाऱ्यांना निवडीचे पत्र देण्यात आले असून, वरिष्ठांनी सर्वांचे अभिनंदन करून भावी वाटचालीस शुभेच्छा व्यक्त केल्या.

# माजलगाव शहर पोलीस ठाण्यात २७ तर ग्रामीण ठाण्यात दहा नवीन पोलीस कर्मचारी दाखल

## माजलगाव पोलिसांचा अतिरीक्त तान झाला कमी; शहर पोलीस निरीक्षक राहुल सूर्यतळ, ग्रामीण पोलीस निरीक्षक बालक कोळी यांच्या पाठपुराव्याला यश

माजलगाव । प्रतिनिधी

माजलगाव पोलिसात गेल्या अनेक वर्षापासून मंजूर पदांपेक्षा निम्मे कर्मचारी पदे रिक्त असल्याने येथील उपलब्ध पोलिस कर्मचाऱ्यांवर नेहमीच कामाचा अतिरिक्त ताण पडत आलेला आहे. त्यामुळे पोलिसांचे संख्याबळ वाढवण्यासाठी शहर पोलीस राहुल सूर्यतळ व ग्रामीण पोलीस निरीक्षक बालक कोळी यांनी सतत पोलीस अधीक्षक नवनीत कावत यांच्याकडे पाठपुरावा करून शहर पोलीस ठाण्यात २७ तर ग्रामीण पोलीस ठाण्यात १० नवीन पोलीस कर्मचारी दाखल करून घेण्यात यश मिळवले आहे. यामुळे पोलिसांचे संख्याबळ वाढल्याने त्यांच्यावर पडनारा अतिरिक्त कामाचा ताण कमी होण्यास मदत होनार आहे.

माजलगाव शहरासह ग्रामीण भागाचा विस्तार आणि लोकसंख्या झपाट्याने वाढत आहे.बाजारपेठा, सरकारी कार्यालय, शाळा कॉलेज, मोठमोठे हॉस्पिटल याठिकाणी उभारल्या जात आहेत. त्यामुळे मोठी आर्थिक उलाढाल या ठिकाणी होत आहे. राजकीय, सामाजिक स्थिती बदलत आहे. त्यामुळे गुन्ह्यांच्या प्रमाणात वाढ होत आहे.शहरासह ग्रामीण भागात कायदा आणि सुव्यवस्था राखण्यास मोठी अडचण निर्माण होत आली आहे. तालुक्याची भौगोलिक राजकीय, सामाजिक परिस्थिती लक्षात घेता पुरेशा प्रमाणात पोलिस कर्मचारी असले पाहिजेत.परंतु याठिकाणी अपुऱ्या कर्मचाऱ्यांवर काम भागवले जात होते. ज्यामुळे पोलीस कर्मचाऱ्यांवर अंतिरिक्त कामाचा ताण नेहमीच पोलीस कर्मचाऱ्यांवर पडत आलेला आहे. माजलगाव शहरासह तालुक्यातील ११६ गावातील नागरिकांचा संपर्क येतो शहर पोलिस ठाण्यात अधिकारी व कर्मचाऱ्यांसह एकूण ९० पदे मंजूर आहेत. परंतु याठिकाणी ४५ अधिकारी कर्मचाऱ्यावर कामकाज पाहिले जात होते. तर ग्रामीण पोलीस ठाण्यात ८० पद मंजूर आहेत. याठिकाणी ३९ कर्मचाऱ्यांवर कामकाजपाहिले जात होते. शहर तालुक्याचा वाढता विस्तार लक्षात घेता ही अगदी कमी संख्या आहे होती. अपुऱ्या कर्मचाऱ्यांमुळे पोलिसांची चांगलीच दमछाक होत होती. तसेच प्रत्येक कर्मचाऱ्यावर अतिरिक्त कामाचा ताण पडत होता. यातच कामांची अदलाबदल झाल्यामुळे अधिकारी, कर्मचाऱ्यांना याचा देखील वेगळा मनस्ताप सहन करावा लागतो. त्यामुळे कामगिरीवरही परिणाम होत आहे.



हि बाब लक्षात घेता शहर ठाण्यात रुजू झालेले पोलीस निरीक्षक राहुल सूर्यतळ ग्रामीण ठाण्यात रुजू झालेले बालक कोळी यांनी पोलीस अधीक्षक यांच्या निदर्शनास ही बाब आणून दिली. यासाठी सतत पाठपुरावा केला. याचा परिणाम म्हणून शहर ठाण्यात २७ नवीन पोलीस दाखल झाले आहेत तर ग्रामीण पोलीस ठाण्यात १० पोलीस कर्मचारी दाखल झालेत.यामुळे पोलिसांचे संख्याबळ तालुक्यात वाढले असून त्यांच्यावर पडणारा अतिरिक्त तानाचा काम कमी होणार आहे.

शहर पोलिसात कार्यरत अधिकारी कर्मचारी. पोलिस निरीक्षक १, सहायक पोलिस निरीक्षक १,पोलिस उपनिरीक्षक २, सहाय्यक पोलिस उपनिरीक्षक ७, पोलिस हवालदार २१,पोलिस नाईक ४,पोलिस शिपाई २४,महिला पोलीस ११ असे ७२ अधिकारी,पोलिस कर्मचारी कार्यरत आहेत. ग्रामीण पोलीस ठाण्यात कार्यरत अधिकारी कर्मचारी. पोलिस निरीक्षक १, सहायक पोलिस निरीक्षक १, पोलिस उपनिरीक्षक २, सहाय्यक पोलीस उपनिरीक्षक ६, पोलिस हेड कॉन्स्टेबल ८, पोलिस नाईक ५, पोलीस शिपाई १४, महिला पोलीस १२

# अलहुदा उर्दू हायस्कूल बीडच्या विद्यार्थिनींचे ऑलिम्पियाड राष्ट्रीय परीक्षेत घवघवीत यश



**बीड । प्रतिनिधी**

नूर एज्युकेशनल अॅण्ड वेल्फेअर सोसायटी द्वारा संचलित अलहुदा उर्दू हायस्कूल,बीड या शाळेच्या विद्यार्थिनींनी सी.पी.एस ऑलिम्पियाड राष्ट्रीय स्तरावरील परीक्षेत उज्वल यश संपादन करत शाळेचा व शहराचा गौरव वाढविला आहे.

शाळेची इयत्ता दहावीची विद्यार्थीनी सय्यद मेहरीन अंजुम माजेदोद्दीन हिने या परीक्षेच्या पहिल्या फेरीत १०० पैकी ९२ गुण व दुसऱ्या फेरीत ८५ गुण मिळवत एकूण उज्वल यश मिळवले असून, तिला गोल्ड मेडल (सुवर्णपदक) प्रदान करण्यात आले आहे. यासोबतच तिने राष्ट्रीय स्तरावर १४ वा क्रमांक (रँक) मिळवून विशेष कौतुकास पात्र ठरली आहे. याच शाळेतील इयत्ता दहावीची आणखी एक विद्यार्थीनी शेख आयेशा तकदीस शेख मोइजुद्दीन हिने देखील उल्लेखनीय यश मिळवत पहिल्या फेरीत ८९ गुण व दुसऱ्या फेरीत ८२ गुण मिळवले असून, तिला सिल्वर मेडल (रौप्यपदक) प्राप्त झाले आहे. तिने राष्ट्रीय स्तरावर २४ वा क्रमांक मिळवून आपल्या गुणवत्तेची छाप पाडली आहे. या दोन्ही विद्यार्थिनींच्या यशाबद्दल शाळेचे मुख्याध्यापक डॉ. सिराज खान आरजू, संस्थेचे अध्यक्ष सय्यद शफीक हाशमी, सचिव उबेदुल्लाह खान, तसेच सर्व शिक्षकवृंद, पालक आणि शाळा समिती सदस्यांनी अभिनंदन करून पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या आहेत.या यशामुळे शाळेतील इतर विद्यार्थ्यांमध्येही स्पर्धा परीक्षेबाबत आत्मविश्वास निर्माण झाला असून, शाळेची शैक्षणिक गुणवत्ता अधोरेखित झाली आहे.



**माजलगाव:- शेतकरी कामगार पक्षाच्या माजलगाव शहर चिटणीस पदी भाई सलीम खान इब्राहिम खान पठाण यांची शेतकरी कामगार पक्षाच्या बैठकीत निवड करण्यात आली त्यावेळी त्यांचा सत्कार करुन निवडीचे पत्र देताना शेतकरी कामगार पक्षाचे नेते भाई अॅड.नारायण गोले पाटील,भाई मुंजा पांचाळ,भाई श्रीराम कोरडे आदी.**

# माजलगावात गावठी दारू विकणाऱ्या महिलांवर कारवाई

**माजलगाव । प्रतिनिधी**

शहर पोलीसांना दि १७ जुन बुधवार रोजी गोपनिय माहीतीच्या आधारे माजलगांव शहरातील गौतमनगर भागात रात्री ९:१५ वाजता छापा मारुन तेथे अवैधरित्या गावठी हातभट्टीची चोरटी विक्री करणारी महीला नामे निर्मला भागवत मेंडके रा. गौतमनगर माजलगांव हीचे ताब्यातुन गावळी हातभट्टीची ६० लिटर तयार दारु तसेच गावठी दारु तयार करण्यासाठी उपयोगात येणारे २५० लिटर रसायन,तसेच दारु व रसायण ठेवण्यासाठी वापरात असलेले प्लास्टीकचे व लोखंडी ड्रम असा एकूण ५०,५००/- रुपयाचा मुद्देमाल जप्त करुन नमुद महलेविरुध्द गु.र.नं. २२०/२०२५ कलम ६५ (ई),(फ) महाराष्ट्र दारुबंदी कायद्यान्वये कारवाई करण्यात आली आहे.



सदरची कारवाई नवनीत कॉंवत, पोलीस अधीक्षक बीड,श्रीमती चेतना तिडके,अप्पर पोलीस अधीक्षक अंबाजोगाई,यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक राहुल सुर्यतळ, सहा.साह्यक पोलीस निरीक्षक प्रल्हाद मुंडे,पोहेकॉ गणेश नांगरे,माधव तोटेवाड,पोलीस अंमलदार महादेव बहीरवाळ,महीला पोलीस अंमलदार रवीना जाधव यांनी केली आहे.

# पाऊस लांबला, पेरण्या खोळंबल्या

**अंबाजोगाई । प्रतिनिधी**

**तालुक्यातील शेतकऱ्यांनी मध्यंतरी झालेल्या पावसावर शेतीची मशागत पुर्ण करून शेतकरी आता पुन्हा पाऊस कधी पेरणी योग्य पडतो याची वाट बघत आहे. परंतु जून महिन्याचा पंधरवाडा उलटला तरीही सध्या पावसाने दडी मारल्याने शेतकरी वर्ग चिंतातूर झाला असून खरीप हंगामातील पेरण्या पूर्णपणे खोळंबल्या आहेत. वरूणराजाच्या आगमनास होत असलेला विलंब पेरणी साठी अवघड आहे भूगर्भातील पाणी पातळी सध्या अवकाळी पावसामुळे चांगली आहे.**



सध्या नक्षत्रे कोरडे जात आहेत. जुनचा पंधरवाडा संपला तरी पावसाच्या आगमनाची साधी चाहूल नाही. अवकाळी पाऊस चांगला झाल्याने ऊसाला पाणी भरपूर मिळाले आहे हवामान खात्याने यंदा जाहीर केलेल्या अंदाजाने शेतकरी सुखावला होता. त्यामुळे शेतीची कामे जूनच्या पंधरवाड्यात बहुतांशी शेतकऱ्यांनी पूर्ण करून घेतली. मात्र, आता पावसाने दडी मारल्याने खरीप पेरणी खोळंबली आहे दोन वर्षे खरिपाच्या पेरणीसाठी वेळेवर पाऊस झाला होता. यामुळे पैसे देणारे पीक म्हणून ओळखल्या जाणाऱ्या सोयाबीनचा पेरा जास्त क्षेत्रावर झाला होता. यंदाही शेतकरी वर्ग पेरण्याच्या तयारीत होता, परंतु पावसाचाच पत्ता नसल्याने खरिपाच्या पेरण्या खोळांबल्या गेल्या आहेत. गेली दोन वर्षे समाधानकारक पाऊस झाल्याने भूगर्भातील पाणी पातळीत वाढ झाली होती. त्याचा परिणाम विहीर बागायत क्षेत्रातदेखील ऊसाची लागवड मोठ्या प्राणावर झाली आहे.मात्र आता पावसाने ओढ दिल्याने या पिकास पाणी कमी पडू लागले आहे. आता पाऊस लांबल्यामुळे विहीरीचे पाणी पिकाला पुरेनासे झाले आहे. अलिकडे चांगला पाऊस झाल्यास खरिपाची पेरणी होऊ शकेल. असा अंदाज शेतकरी वर्गातून व्यक्त केला जात आहे.

# जिलेटीन स्फोटातील गंभीर जखमी भारत पवार यांना शासनाने मदत करावी–भुंबे

अंबाजोगाई । प्रतिनिधी

तालुक्यातील तळेगाव तांडा या ठिकाणी विहिरीचे खोदकाम सुरू होते. यावेळी विहिरीचे होल घेताना मोठा स्फोट झाला. या स्फोटात चौघे जण गंभीर जखमी झाले. गंभीर जखमींपैकी एक जणाचा जागीच मृत्यू झाला. तर मजूर भारत तुकाराम पवार यांच्या शरीराच्या विविध भागांवर अणकुचीदार दगड उडून लागले. यामुळे त्यांचा एक डोळा कायमचा निकामी झाला आहे. तर शरीरातील रक्तवाहिन्यांना गंभीर इजा पोहोचली आहे. त्यामुळे जिलेटीन स्फोटातील मरण पावलेल्या व गंभीर जखमींना शासनाने तात्काळ मदत करावी अशी मागणी रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया (खरात गट) चे मराठवाडा विभागीय अध्यक्ष अक्षय भुंबे यांनी तहसिलदार व उपविभागीय अधिकारी यांना मंगळवार, दिनांक १७ जुन रोजी दिलेल्या निवेदनाद्वारे केली आहे.



रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया (खरात गट) चे मराठवाडा विभागीय अध्यक्ष अक्षय युवराज भुंबे यांनी अंबाजोगाईचे तहसिलदार व उपविभागीय अधिकारी यांना या प्रकरणी निवेदन दिले आहे. आमच्या प्रतिनिधीशी बोलताना भुंबे यांनी सांगितले की, भारत तुकाराम पवार (रा.तळेगाव, ता.अंबाजोगाई) हे विहीरीचे खोदकाम करताना जिलेटीन स्फोट (ब्लास्ट) होऊन त्यांचा डोळा निकामी झाल्यामुळे कायमचे अपंगत्व आले असल्यामुळे सदरील काम करणाऱ्या गुत्तेदार यांच्याकडे जिलेटीन सारख्या स्फोटक भारी पदार्थ बाळगण्याचे व त्याचा व्यवसायासाठी वापर करण्याचा परवाना (लायसन्स) नसताना ते वापरल्यामुळे त्या गुत्तेदारांवर तात्काळ गुन्हा दाखल करून मजूर भारत तुकाराम पवार यांना नुकसान भरपाई देण्यात यावी. याबाबत अधिक माहिती अशी की, दिनांक १८ मार्च २०२५ रोजी उत्तम पांडुरंग आडे (रा.तळेगाव तांडा, ता.अंबाजोगाई.) यांच्या विहीरीचे खोदकाम करीत असताना जुन्या होल मध्ये जिलेटीन असल्यामुळे नवे होल घेताना त्याचा स्फोट होऊन भारत तुकाराम पवार, धनराज अनंत दहीफळे, जीवन हरिश्चंद्र दहीफळे, तुकाराम विठ्ठल दहीफळे हे चौघेजण गंभीर जखमी झाले होते. त्यापैकी धनराज अनंत दहीफळे हे जागीच मरण पावले होते. या प्रकरणी दिनांक ◀◀ पान ३ वर

# वादळात सोलार पॅनलचे नुकसान

दिंद्रुड । प्रतिनिधी

अचानक सुटलेला सुसाट्याचे वादळ वारा व पावसाने सोलार प्रकल्पाचे नुकसान झाल्याची घटना मंगळवारी सायंकाळी घडली.



माजलगाव तालुक्यातील बेलूरा येथील केशव लिंबाजी फपाळ यांचे गट नंबर ४८७ मध्ये पाच एकर शेत आहे. मंगळवारी सायंकाळी अचानक आलेल्या वादळ वारा व पावसाने येथील सोलार प्रकल्पाच्या प्लेट उडून फुटल्या व नुकसान झाले.

# अंबाजोगाई पिपल्स बँकेच्या एनपीए व्यवस्थापनामुळे बँकेस भारतरत्न सहकारिता पुरस्कार प्रदान

## ग्राहकांचा विश्वास व सहकार्याच्या बळावरच पिपल्स बँकेने हे यश मिळवले – राजकिशोर मोदी

अंबाजोगाई । प्रतिनिधी

अंबाजोगाई पिपल्स को-ऑपरेटिव्ह सहकारी बँक लि.अंबाजोगाई या बँकेला एनपीएचे व्यवस्थापन सर्वोत्तम केले यासाठी शहरी सहकारी बँक गटात भारतरत्न सहकारिता पुरस्कार - २०२५ ने नुकतेच गौरवविण्यात आले आहे. अंबाजोगाई पीपल्स बँकेने पारदर्शक, गतिमान कारभार व तत्पर सेवेला नेहमीच प्राधान्य दिले आहे. त्यामुळे नेहमीच उत्तम टीमवर्क करून बँकेने सभासद, ठेविदार, ग्राहक आणि हितचिंतक यांची विश्वासार्हता कमावली व याच विश्वासाच्या बळावरच बँक हे यश मिळवू शकली असे बँकेचे संस्थापक अध्यक्ष राजकिशोर मोदी यांनी सांगितले.

यंदा चालू आर्थिक वर्षामध्ये बँकेस मिळालेला पुरस्कार हा बँकेचे सर्व सन्माननीय संचालक, मुख्य कार्यकारी अधिकारी, अधिकारी, सर्व शाखाधिकारी, कर्मचारी यांनी केलेल्या उत्तम टीम वर्कचेच फलित आहे. सहकार क्षेत्रामध्ये काम करीत असताना एखाद्या बँकेने केंद्र सरकार, आरबीआय, सहकार खाते आणि बँकींगचे सर्व नियम पाळून समाजातील शेवटच्या घटकांपर्यंत बँकींग सेवा, विविध सुविधा उपलब्ध




करून देत आर्थिक वर्षात आपला एनपीए शुन्य टक्के ठेवण्याचा, कमीत-कमी राखण्याचा अटोकाट प्रयत्न केला पाहिजे, यासाठीच काटेकोरपणे काम करीत बँकेकडून एनपीएचे व्यवस्थापन सर्वोत्तम केले जाते. अंबाजोगाई पीपल्स को-ऑपरेटिव्ह सहकारी बँक लि.अंबाजोगाई या आपल्या बँकेने ही आपला एनपीए हा कमीत-कमी राखण्याचा, ठेवण्याचा अटोकाट प्रयत्न प्रत्येक आर्थिक वर्षांत केलेला आहे. अंबाजोगाई पीपल्स बँकेने एनपीएचे व्यवस्थापन सर्वोत्तम केले याची दखल घेत आशिया खंडातील सहकारी ◀◀ पान ३ वर

# मराठी भाषेवरच भर दिला जावा हिंदी भाषेची सक्ती नको-राज ठाकरेंच्या सुचना

**बीड । प्रतिनिधी**

मनसेचे अध्यक्ष राज ठाकरे यांनी प्रत्येक शाळेमध्ये मराठी विषय शिकवला जावा हिंदी भाषेची सक्ती नको यासाठी मनसेचे जिल्हासचिव सोमेश कदम बीडमधील प्रत्येक शाळेतील मुख्याध्यापकांना भेटी देवून हिंदी विषयाची सक्ती नको असे कळवणार असल्याचे पत्रकाद्वारे जिल्हासचिव सोमेश कदम यांनी सांगितले आहे.

पुढे दिलेल्या पत्रकात म्हटले आहे की, महाराष्ट्रात शिक्षण विभागाचा नुसता गोंधळ सुरु आहे. आधी महाराष्ट्र राज्य शिक्षण मंडळाचा अभ्यासक्रम असलेल्या शाळांमध्ये इयत्ता पहिलीपासून तीन भाषा शिकवायच्या आणि त्यात मराठी, इंग्रजी आणि हिंदी सक्तीची करायची असा निर्णय आला. ज्याला महाराष्ट्र नवनिर्माण सेनेने कडाडून विरोध केला, पुढे त्यावर जनमत तयार झालं. पुढे जनमताचा रेटा बघून सरकारने हळूच पळवाट काढली आणि सांगितलं की हिंदीची सक्ती नसेल पण कोणाला हिंदी शिकायची असेल तर तो अभ्यासक्रम उपलब्ध करून दिला जाईल.हिंदी भाषेच्या सक्तीचा प्रश्नच येत नाही. कारण हिंदी ही काही राष्ट्रभाषा नाही. ती उत्तरेतल्या काही प्रांतांमध्ये बोलली जाणारी भाषा आहे, म्हणजे एका अर्थाने ती असलीच तर राज्यभाषा आहे. त्यात ती ज्या राज्यांमध्ये बोलली जाते तिथे पण अनेक स्थानिक भाषा आहेत, ज्या हिंदीच्या वरवंट्याखाली येऊ लागल्यात आणि अशी भीती आहे की तिथल्या स्थानिक बोलीभाषा काळाच्या ओघात नष्ट होतील. त्यामुळे मराठी भाषेवरच भर दिल्या जावा यासाठी प्रत्येक शाळेतील मुख्याध्यापकांना भेटी देवून हिंदी विषयाची सक्ती नको असे पत्रकाद्वारे जिल्हासचिव सोमेश कदम यांनी सांगितले आहे.

This leaflet printed by the printer, publisher, owner Seema Bhimrao Maske at Jagmitra Printers And Sales Corporation Sumati Nagar, Jalana Road Beed printed here, Office Dainik Rajya Loktantra, Rajiv Gandhi Chowk Canol Road Beed, Tal. Dist.Beed 431122 (maharashtra) Published at. Editor Seema Bhimrao Maske,(mokashe) Executive Editor Ashok Nagorao Khade. Editors do not necessarily agree with the opinions expressed in the text. Court case in Beed tribunal. Email -rajyaloktanatra75@gmail.com NO.L SB/BEED/RNP-206/2024-26

हे पत्र मुद्रक, प्रकाशक, मालक सीमा भिमराव मस्के यांनी जगमित्र प्रिंटर्स अँड सेल्स कॉर्पोरेशन सुमती नगर, जालना रोड, बीड येथे छापून कार्यालय दैनिक राज्य लोकतंत्र, राजीव गांधी चौक कॅनॉल रोड बीड, ता.जि.बीड-४३११२२(महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. संपादक-सीमा भिमराव मस्के, (मोकाशे) कार्यकारी संपादक - अशोक नागोराव खाडे या अंकात प्रकाशित झालेल्या मजकुरातील मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही. न्यायालयीन वाद बीड न्यायकक्षेत. : ईमेल - rajyaloktantra75@gmail.com NO.L SB/BEED/RNP-206/2024-26

cmyk

दैनिक राज्य लोकतंत्र
नवी दिशा...नवे विचार...

पुणे विशेष

गुरूवार, दि.१९ जुन २०२५ । पान ७

# पुण्यनगरी होतीये सज्ज! वारकऱ्यांच्या निवासाची जय्यत तयारी; महिलांच्या सुरक्षेसाठी सीसीटीव्ही अन्

**पुणे । प्रतिनिधी**

राज्याला आषाढी वारीचे वेध लागले आहेत. दोन दिवसांमध्ये पुण्यामध्ये संत तुकाराम महाराज व संत ज्ञानेश्वर महाराज यांच्या पालख्यांचे आगमन होणार आहे. पुणे शहरात पालखीचे आगमन येत्या गुरुवारी (दि.२०) होणार असून दुसऱ्या दिवशी म्हणजे २१ जून रोजी दोन्ही पालख्यांचे पुण्यामध्ये मुक्काम असणार आहे. यावेळी हजारो वारकरी हे शहरामध्ये दाखल होत असतात. या सर्व वारकऱ्यांच्या निवासाची तयारी पूर्ण झाली आहे.



पुणे शहर आषाढी वारीसाठी तयार होत आहे. वारकऱ्यांच्या स्वागतासाठी प्रशासन आणि पोलिसांकडून योग्य व्यवस्था करण्यात आली आहे. त्याचबरोबर पावसाचा जोर लक्षात घेता निवासाची सोय करण्यात आली आहे. त्याचबरोबर महिलांसाठी स्वतंत्र निवासस्थाने तसेच त्याठिकाणी सीसीटीव्ही कॅमेरे बसवण्यात आले आहे. याचबरोबर स्वच्छता आणि आरोग्याच्या दृष्टीने निर्जंतुकीकरणाची विशेष व्यवस्था करण्यात आली आहे, अशी माहिती निवडुंग्या विठोबा मंदिराचे विश्वस्त आनंद पाध्ये यांनी दिली.

वारीच्या पार्श्वभूमीवर २० जून रोजी पालख्या शहरात दाखल होणार असून, त्या अनुषंगाने शहरातील शाळा, महाविद्यालये, मंदिर परिसर, सार्वजनिक सभागृहे, तसेच सामाजिक संस्था यामध्ये वारकऱ्यांच्या मुक्कामाची व्यवस्था करण्यात आली आहे.

विशेषतः महिला वारकऱ्यांच्या सुरक्षिततेसाठी नियोजन अधिक काटेकोर करण्यात आले आहे. निवासस्थानी सीसीटीव्ही कॅमेरे लावण्यात आले असून, महिला स्वयंसेविकांची नियुक्तीही करण्यात आली आहे. प्रत्येक निवासस्थळी आरोग्यविषयक स्वच्छता राखून निर्जंतुकीकरण करण्यात आले आहे.

याशिवाय, महापालिकेच्या आरोग्य विभागाने प्रत्येक मुक्काम स्थळी प्राथमिक उपचारासाठी वैद्यकीय पथक तैनात केले आहे. कोणताही संसर्ग पसरू नये यासाठी विशेष काळजी घेतली जात आहे.

पुणे मर्चंट चेंबरचे संचालक विजय मुथा यांनी सांगितले की, या वर्षी मार्केट यार्डमध्ये सुमारे १५,००० पेक्षा अधिक वारकऱ्यांच्या निवासाची व्यवस्था करण्यात आली आहे. व्यापाऱ्यांकडून पाण्याची सोय, विद्युत व्यवस्था आणि जेवणाची व्यवस्था करण्यात आली आहे. पालख्या पुण्यात दाखल झाल्यानंतर व्यापार मंडळ आणि बाजार समितीच्या वतीने छत्र्या, औषधपेट्या, रेनकोट तसेच अन्नपदार्थ ठेवण्यासाठी आवश्यक वस्तूंचे वाटप वारकऱ्यांना करण्यात येते. लायन्स क्लबच्या वतीने पाण्याचा टँकर वारीसोबत दिला जातो, तर चालक ट्रेडिंग या संस्थेच्या वतीने एक रुग्णवाहिका आणि पंधरा ते सोळा डॉक्टरांची टीम वारीसोबत असते.

सारसबाग विश्वस्त प्रवीण चोरबेले यांनी सांगितले की, २१ जून रोजी श्री महालक्ष्मी मंदिर परिसरात आरोग्य शिबीर आयोजित करण्यात आले आहे. याचबरोबर मार्केटयार्ड परिसरात २०० हून अधिक दिंड्या मुक्कामी राहणार आहेत. मार्केटयार्डातील मोठ्या गोडाऊनमध्ये निवासासाठी पुरेशी जागा आणि सुविधा उपलब्ध करुन दिल्या आहेत.

पुणे मर्चंट चेंबरचे कमिटी अध्यक्ष उत्तम भाटिया यांनी सांगितले की, मार्केटयार्ड परिसरात वारीच्या स्वागतासाठी विद्युत रोषणाई, मंडप, महाप्रसाद यांसारख्या सर्व सुविधा सज्ज आहेत. २१ जूनच्या महाप्रसादाची पूर्वतयारी देखील पूर्ण झाली आहे.

शहरातील अनेक सामाजिक संस्थांनीही पुढाकार घेत वारकऱ्यांच्या सेवेसाठी मोफत अन्नदान, चहा-पाण्याची सोय, आरोग्य तपासणी शिबिरे आणि औषध वितरणाचे उपक्रम राबवले आहेत. पुणे शहर संपूर्णतः वारीच्या स्वागतासाठी सज्ज असून, रस्त्यांवर रांगोळ्या, तोरणं, फुलांची सजावट आणि विद्युत रोषणाई करण्यात आली आहे.

# दक्षिण आफ्रिकेत बारामतीचे धावपटू चमकले

**बारामती । प्रतिनिधी**

दक्षिण आफ्रिकेत पार पडलेल्या अत्यंत खडतर समजल्या जाणाऱ्या व जागतिक स्तरावर वेगळे महत्त्व असलेल्या कॉम्रिड मॅरेथॉनमध्ये बारामतीतील धावपटूंनी उल्लेखनीय यश संपादन केले. सुजित काकडे ९ तास ४३ मिनिटे, प्रशांत शिर्के यांनी ९ तास ५४ तर केतनकुमार माने यांनी सलग दुसऱ्या वर्षी १० तास ५ मिनिटांत ही स्पर्धा पूर्ण केली.



त्यांच्यासमवेत सादिया सय्यद यांनीही सलग दुसऱ्या वर्षी १० तास ४२, संतोष जाधव यांनी ११ तास २५ मिनिटे, राहुल चौधर ११ तास ३८ मिनिटे, डॉ. शंतनू काळोखे ११ तास ४० मिनिटे, डॉ. जयदीप फरांदे ११ तास ४३ मिनिटे, चांगदेव पवार ११ तास ५६ मिनिटांची वेळ नोंदवत स्पर्धा यशस्वीपणे पूर्ण केली.

सर्व स्पर्धकांनी स्वतःची नोकरी, व्यवसाय सांभाळून सातत्याने मेहनत व सराव करून स्पर्धेत सहभाग घेतला होता. जागतिक स्तरावरील अनेक धावपटू मॅरेथॉनमध्ये सहभागी होण्यासाठी येतात. स्पर्धेत बारामतीकर धावपटूंची ही कामगिरी उल्लेखनीय ठरली आहे. बारामतीचे दादासाहेब सत्रे आणि हडपसरचे डॉ. योगेश सातव यांनी धावपटूंना मार्गदर्शन केले.

आरोग्य उत्तम राहण्यासाठी रनिंग करता करता आमचा व्यायामातील ग्रुप मॅरेथॉन करू लागला त्यामध्ये आमचे मित्र दादासो सत्रे सध्या माझे रनिंग कोच त्यांच्या मार्गदर्शनाखाली आम्ही कॉम्रेड करू शकतो याची जाणीव त्यांनी आम्हाला करून दिली .त्यानुसार आमचे मित्र केतन माने, राहुल चौधर आरोग्य धनसंपदा ग्रुपचे सदस्य नक्षत्र गार्डन रनिंग ग्रुपच्या सदस्यांबरोबर सराव केला. सर्वात सातत्य ठेवल्याने विना अडथळा स्पर्धा पूर्ण करू शकलो.

– प्रशांत शिर्के, धावपटू.

# जेजुरीजवळ भीषण अपघात; ८ जण जागीच ठार, ५ गंभीर जखमी

पुणे जिल्ह्यातील जेजुरी-मोरगाव रस्त्यावर भीषण अपघाताची घटना घडली असून, साहित्य उतरवत असलेल्या पिकअपला एका भरधाव कारने धडक देऊन ८ जणांचा जागिच मृत्यू झाल्याची धक्कादायक घटना घडली. तर पाच जण जखमी झाले आहेत. मृतांमध्ये पाचजण पुणे जिल्ह्यातील असून, तिघे सोलापूर व उत्तरप्रदेशातील असे आहेत. अपघाताने जिल्ह्यात खळबळ उडाली आहे. बुधवारी रात्री नऊच्या सुमारास हा अपघात झाला आहे.

सोमनाथ रामचंद्र वायसे, रामु संजिवन यादव (रा. दोघेही.नाझरे, ता. पुरंदर), अजयकुमार चव्हाण (रा. उत्तरप्रदेश), अजित अशोक जाधव (रा. कांजळे, ता. भोर), किरण भारत राऊत (रा. पवारवाडी, ता. इंदापुर), अश्विनी संतोष ऐसार (रा. नागरसुर, सोलापूर), अक्षय शंकर राऊत (रा.झारगडवाडी, ता. बारामती) अशी मृत्यू झालेल्यांची नावे आहेत. तर, एका व्यक्तीची ओळख पटू शकलेली नाही. याघटनेत ५ जण गंभीररित्या जखमी झाले असून, इतर दोन किरकोळ जखमी आहेत. याप्रकरणी जेजुरी पोलीस ठाण्यात रात्री उशिरापर्यंत गुन्हा नोंद करण्याचे काम सुरू होते.

पोलिसांच्या माहितीनुसार, जेजुरी मोरगाव रोडवरील किर्लोस्कर कंपनीजवळ श्रीराम ढाबा येथे एक पिकअप टेम्पो थांबला होता. त्यामधील साहित्य खाली उतरवण्याचे काम सुरू होते. दोघेजण साहित्य खाली घेत होते. यादरम्यान, पुण्याकडून मोरगावकडे जाणाऱ्या एका भरधाव स्वीफ्ट डिझायर कारने या पिकअपला जोराची धडक दिली. ही धडक इतकी भीषण होती की, शेजारी उभ्या असलेल्या दुसऱ्या एका कारला देखील या स्वीफ्ट कारने धडक दिली. ती त्या कारवर जाऊन आदळली. या भीषण अपघातात आठ जणांचा जागीच मृत्यू झाला. तर, ५ जण जखमी झाल्याची माहिती आहे.

# ज्ञानेश्वर माऊलींचे मानाचे अश्व श्रीमंत भाऊसाहेब रंगारी गणपतीच्या चरणी लीन

**पुणे । प्रतिनिधी**

वैष्णवांचा मेळा म्हटल्या जाणाऱ्या आषाढी वारीला सुरुवात झाली आहे. आज संत तुकाराम महाराजांच्या पालखीचे देहूमधून प्रस्थान झाले आहे. त्याचबरोबर उद्या संत ज्ञानेश्वर माऊलींच्या पालखीचे प्रस्तान आळंदीहून होणार आहे. पुणे शहरात पालखीचे आगमन येत्या गुरुवारी (दि.२०) होणार असून दुसऱ्या दिवशी म्हणजे २१ जून रोजी दोन्ही पालख्यांचे पुण्यामध्ये मुक्काम असणार आहे. २२ जून रोजी दोन्ही पालख्या पुढील प्रवासांसाठी मार्गस्थ होणार आहेत. दरम्यान संतश्रेष्ठ ज्ञानेश्वर महाराजांच्या पालखीतील मानाच्या अश्वांनी हिंदुस्थानातील पहिला सार्वजनिक गणपती श्रीमंत भाऊसाहेब रंगारी गणपतीचे दर्शन घेतले.



सार्वजनिक गणपती श्रीमंत भाऊसाहेब रंगारी गणपतीचे संत ज्ञानेश्वर माऊलींच्या अश्वांनी दर्शन घेतले आहे. यावेळी भाविक आणि मान्यवरांच्या उपस्थितीत आरती करण्यात आली.अंकली (कर्नाटक) येथील श्रीमंत शितोळे सरकार यांचे अश्व अंकली येथून पायी येऊन दरवर्षी संतश्रेष्ठ ज्ञानेश्वर महाराज यांच्या पालखीत सहभागी होत असतात. संतश्रेष्ठ ज्ञानेश्वर महाराज यांच्या पालखी सोहळ्यात या दोन अश्वांना मानाचे स्थान असते. या अश्वांनी पुण्यातील महत्त्वाच्या गणपती बाप्पांचे दर्शन घेतले आहे.

उद्या (दि. १९ जून) ज्ञानेश्वर माऊलींच्या पालखीचे प्रस्थान ठेवण्यात येणार असून या पालखी सोहळ्यात हे दोन्ही अश्व सहभागी होऊन पंढरपूरपर्यंत जात असतात. वारकरी संप्रदायात १८३२ पासूनची ही समृद्ध परंपरा आहे. पालखी सोहळा मार्गस्थ झाल्यानंतर संतश्रेष्ठ ज्ञानेश्वर महाराज यांच्या रथापुढे जो अश्व असतो तो माऊलींचा अश्व असतो. तर जरीपटका घेऊन अश्वस्वार असतो तो स्वाराचा अश्व असतो. असे हे दोन अश्व पालखी सोहळ्यात सहभागी होत असतात.

अंकली येथील शितोळे राजे यांच्याकडे या अश्वांची ही मानाची परंपरा आहे. मंगळवारी या अश्वांनी श्रीमंत भाऊसाहेब रंगारी गणपतीचे दर्शन घेतले. यावेळी श्रीमंत भाऊसाहेब रंगारी ट्रस्टकडून श्रीमंत उर्जितसिंह राजे शितोळे सरकार, श्रीमंत महादजीराजे शितोळे सरकार यांचा यथोचित सन्मान करण्यात आला. ट्रस्टचे अध्यक्ष श्री संजीव जावळे यांच्यासह विश्वस्त, भाविक आणि कार्यकर्ते यावेळी उपस्थित होते.

याचबरोबर पुण्यातील सुप्रसिद्ध अशा श्रीमंत दगडूशेठ हलवाई गणपतीचे देखील या अश्वांनी दर्शन घेतले आहे. संतश्रेष्ठ ज्ञानेश्वर माऊलींच्या पालखी सोहळ्यातील मानाच्या अश्वांनी श्रीमंत दगडूशेठ हलवाई गणपती मंदिराच्या सभामंडपात प्रवेश करून गणरायाला मानवंदना दिली. या प्रसंगी ज्ञानोबा माऊली तुकाराम आणि गणपती बाप्पा मोरया च्या जयघोषात संपूर्ण मंदिर परिसर भक्तिभावाने न्हाऊन निघाला. सुमारे ३०० किलोमीटरचा पायी प्रवास करणारे हे अश्व आता दरवर्षी वारीपूर्वी दगडूशेठ गणपतीचे दर्शन घेऊनच आळंदीच्या दिशेने मार्गस्थ होतात. यंदाही त्यांनी सभामंडपात येत गणरायाचे दर्शन घेतले.

# पुणे महापालिकेतील महिला अधिकाऱ्याचा विनयभंग; भाजप नेत्यावर गुन्हा दाखल

**पुणे । प्रतिनिधी**

**महानगर पालिकेच्या आरोग्य विभागातील एका महिला अधिकाऱ्याच्या विनयभंग केल्या प्रकरणी भाजप नेत्याविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. भाजप कामगार आघाडीचे शहराध्यक्ष ओंकार कदम असे या भाजप नेत्याचे नाव आहे. शिवाजीनगर पोलिस या प्रकरणाचा तपास करत आहेत.**



मिळालेल्या माहितीनुसार, पुणे महानगरपालिकेत आरोग्य विभागात संबंधित महिला अधिकारी कार्यरत आहेत. गेल्या काही महिन्यांपासून ओंकार कदम सातत्याने त्यांच्या विभागात येत होता. अनेकदा त्याने महिला अधिकाऱ्याला शिवीगळही केली. त्यांच्या संमतीशिवाय व्हिडीओ रेकॉर्ड केले. या प्रकरणी महिला अधिकाऱ्याने शिवाजीनगर पोलिस ठाण्यात ओंकार कदमविरोधात तक्रार दाखल केली होती. त्यानंतर कदमला पुणे महापालिकेत प्रवेश बंदीही करण्यात आली होती. राज्य महिला आयोगानेही या प्रकरणाची दखल घेतली. त्यांतर आता त्याच्याविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

पोलिसांनी महिला अधिकाऱ्याच्या तक्रारीनंतर शासकीय कामात अडथळा निर्माण करणे, प्रशासकीय अधिकाऱ्यांना धमकावणे, आणि विनयभंगाप्रकरणी गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पण या घटनेमुळे पुन्हा एकदा पुणे महापालिकेत काम करणाऱ्या महिलांच्या सुरक्षेचा प्रश्न उपस्थित होऊ लागला आहे. तसेच याप्रकरणात यापूर्वीच कारवाई का केली नाही, असा प्रश्न उपस्थित केला जात आहे. पुरेशा पोलिस बंदोबस्ताअभावी महापालिकेच्या आवारात प्रवेश करण्यास मनाई असतानाही ओंकार कदम तिथे सातत्याने का येत-जात होता.

महापालिकेतील एका महिला अधिकाऱ्याला मानसिक त्रास देणाऱ्या पदाधिकाऱ्याविरोधात भाजपचे वरीष्ठ नेते कारवाई का करीत नाही ? असा प्रश्नही सातत्याने उपस्थित केला जात होता. ओंकार कदमविरोधात महापालिकेच्या सुरक्षा विभागानेही पोलिसांकडे तक्रार केली होती. तसेच सदर महीलेने राज्य महिला आयोगाकडेही तक्रार करण्यात आली होती. आयोगाकडे तक्रार करण्यापूर्वी भाजपच्या वरिष्ठ नेत्यांकडेही तक्रार करण्यात आली होती. पण पक्षाकडून त्याच्यावर कोणतीही कारवाई करण्यात आली नाही.

दरम्यान, भाजपच्या एका आघाडीचा शहराध्यक्ष दहा ते पंधरा कार्यकर्त्यंसोबत महापालिका भवनात येतो. अनेकवेळा महापालिकेच्या प्रवेशद्वारापासूनच हे लोक घोषणाबाजी करत आणि गोंधळ घालत महापालिकेत प्रवेश करतात. हा पदाधिकारी जमाव घेऊन महापालिकेतील विविध विभागात जातो. त्याठिकाणी माहिती मागतो आणि आताच्या आताच माहिती पाहिजे म्हणून कार्यालयात किंवा दरवाजात ठिय्या मारून घोषणाबाजी करतो, यामुळे आतील व्यक्तीला बाहेर येता येत नाही आणि बाहेरील व्यक्तीला आतमध्ये जाता येत नाही. दुसरीकडे त्याचे कार्यकर्ते प्रत्येक गोष्टीचे चित्रीकरण करत राहतात. या प्रकारामुळे महापालिकेतील अधिकारी व कर्मचारी त्रस्त झाले होते. यासंदर्भात महापालिकेच्या सुरक्षा विभागाने शिवाजीनगर पोलिस संबंधित भाजप पदाधिकाऱ्यावर कारवाई करण्याची अशी मागणी या पत्राद्वारे केली होती.

महिला अधिकाऱ्याने जानेवारी महिन्यात या पदाधिकाऱ्याविरोधात महापालिका आयुक्तांकडे लेखी तक्रार दिली होती. महापालिकेच्या आरोग्य विभागाच्या अंतर्गत असलेल्या महिला तक्रार निवारण समितीकडे आणि महापालिका आयुक्तांकडे लेखी तक्रार केली होती. महिला अधिकाऱ्याच्या या तक्रारीनंतर अखेर आज त्याच्यावर गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

# कोळगाव डोळस शाळेला टाळे ठोकले

## शिक्षकाची नियुक्ती करा : पहिल्याच दिवशी घटना

मांडवगण फराटा - कोळगाव डोळस (ता. शिरूर) येथे जिल्हा परिषद शाळेच्या पहिल्या दिवशी प्रवेश सोहळ्यादिवशी वेगळाच प्रकार घडला. शाळेत एका रिक्त जागी शिक्षकाची नियुक्ती करा, या मागणीसाठी ग्रामस्थांनी पहिल्याच दिवशी शाळेला कुलूप ठोकले.



काही महिन्यापूर्वी शाळेत एका शिक्षकांकडून एका विद्यार्थिनीशी गैरकृत्य केल्याची तक्रार शिक्षण विभागाकडे केली असता त्याचे निलंबन केले. तेव्हापासून एकच शिक्षक चारही वर्गांना शिकवत आहेत. पालकांनी अनेक वेळा एका शिक्षकाची मागणी केली. परंतु शिक्षण विभागाने मागणीचा विचारच केला नाही. परिणामी संतप्त पालकांनी शाळेला टाळे ठोकले.

शिक्षण विभागाचा तीव्र निषेध नोंदवत जोपर्यंत शाळेला दुसरा शिक्षक मिळत नाही, तोपर्यंत शाळा उघडून देणार नाही, असा पवित्रा ग्रामस्थांनी घेतला. यावेळी उपसरपंच सिद्धार्थ डोळस, विलास जगताप, शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष कैलास सूर्यवंशी, तुकाराम जगताप, माजी सरपंच सोमनाथ सूर्यवंशी, बाबू गोरे, नारायण शेंडगे, प्रकाश वाळुंज, संभाजी कुल, आबासाहेब नागवडे, यशवंत पडवळ, अर्जुन सूर्यवंशी, प्रमोद धामोरे, शंकर कोळपे, उमेश सूर्यवंशी, बाळासाहेब धुमाळ उपस्थित होते.

सहा महिन्यांपासून शाळेत चारही वर्गांना एकच शिक्षक शिकवत आहेत. विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान होत आहे. वेळोवेळी शिक्षणाधिकाऱ्यांना निवेदने देऊनही एक शिक्षक देण्यास टाळाटाळ करीत आहेत. विद्यार्थ्यांचे होणारे नुकसान यास शिक्षण विभागाच जबादार आहेत.

कैलास सूर्यवंशी अध्यक्ष शाळा व्यवस्थापन समिती.

निर्वी केंद्र शाळेतील माने मळा येथील एक शिक्षक कोळगाव डोळस शाळेला देण्यात येणार आहे. ग्रामस्थ व पालक यांच्याशी चर्चा करण्यासाठी विस्तार अधिकारी रघुनाथ पवार यांना पाठविले असून लवकरच शाळा सुरु होईल. ग्रामस्थांनी सहकार्य करावे.

बाळकृष्ण कळमकर, गटशिक्षणाधिकारी, पंचायत समिती शिरूर.

# जालिंदरनगरच्या जिल्हा परिषद शाळेचा जागतिक गौरव: 'वर्ल्ड बेस्ट स्कूल'मध्ये टॉप १० मध्ये स्थान

राजगुरूनगर : खेड तालुक्यातील जालिंदरनगर येथील जिल्हा परिषद प्राथमिक शाळेने जागतिक पातळीवरील 'वर्ल्ड बेस्ट स्कूल प्राईज' स्पर्धेत 'लोकसहभागातून शाळा विकास' विभागात पहिल्या १० शाळांमध्ये स्थान मिळवले आहे. टी ४ एज्युकेशन (ढ४ एर्वीलरींळेप) आयोजित या आंतरराष्ट्रीय स्पर्धेत लाखो शाळांमधून ही शाळा अव्वल ठरली, ही महाराष्ट्र आणि देशासाठी अभिमानाची बाब आहे.

जागतिक दर्जाचे शिक्षण सरकारी शाळेत उपलब्ध करून देण्याच्या उद्देशाने या स्पर्धेत सहभागी झालेल्या जालिंदरनगर शाळेने प्रामाणिक प्रयत्नांद्वारे हे यश संपादन केले. मागील आठवड्यात टी ४ एज्युकेशनकडून प्राप्त ई-मेलद्वारे शाळेची टॉप १० मध्ये निवड झाल्याची माहिती मिळाली. दि. १८ जून रोजी सकाळी ११:३० वाजता जागतिक लाइव्ह कार्यक्रमात याची घोषणा झाली. यानिमित्ताने शाळेत विद्यार्थी, पालक आणि ग्रामस्थांनी आनंदोत्सव साजरा केला. मुख्याध्यापक दत्तात्रय वारे म्हणाले, आंतरराष्ट्रीय शाळांशी तुलना करून आपली प्रगती तपासणे आणि त्यांच्या उत्कृष्ट उपक्रमांचा अवलंब करणे हा आमचा हेतू होता. हे यश सरकारी शाळांच्या क्षमतेचा पुरावा आहे. ही कामगिरी करणारी जालिंदरनगर शाळा देशातील पहिली सरकारी शाळा आहे आणि यंदाच्या स्पर्धेत भारतातील एकमेव शाळा आहे. पुणे जिल्ह्यातील दुर्गम भागातील या शाळेच्या यशाने सरकारी शिक्षण व्यवस्थेचा दृष्टिकोन बदलण्यास आणि शिक्षकांचा आत्मविश्वास वाढवण्यास हातभार लावला आहे.

पुढील टप्प्यात टॉप १० मधून सर्वोच्च शाळेची निवड होईल. त्या शाळेला १ कोटी रुपये बक्षीस मिळेल. यासाठी पब्लिक वोटिंग आवश्यक आहे. भारतातील एकमेव सरकारी शाळा म्हणून जालिंदरनगर शाळेला देशवासीयांच्या पाठिंब्याची गरज आहे. मुख्याध्यापक वारे यांनी सांगितले, पब्लिक वोटिंग आमच्यासाठी आव्हानात्मक आहे, पण देशवासीयांच्या सहकार्याने आम्ही हे यश मिळवू शकतो. या यशाने सरकारी मराठी माध्यमाच्या शाळा खाजगी आणि प्रगत देशांतील शाळांशी स्पर्धा करू शकतात, हे सिद्ध झाले आहे. जालिंदरनगर शाळेच्या या प्रवासाला सर्व स्तरांतून शुभेच्छा मिळत आहेत.

# मुंबई-पुणे एक्सप्रेसवेवर ८ गाड्यांचा भयंकर अपघात; कैद्यांच्या वाहनाला जोरदार टक्कर, १२ पोलीस जखमी!

**मुंबई । प्रतिनिधी**

**मुंबई-पुणे एक्सप्रेसवेवर मंगळवारी (१७ जून) रात्री भातान बोगद्यात ७ ते ८ वाहनांचा भीषण अपघात झाला, ज्यामुळे महामार्गावर प्रचंड वाहतूक कोंडी निर्माण झाली. या अपघातात बांगलादेशी कैद्यांना घेऊन जाणाऱ्या पोलिसांच्या पिंजरा गाडीचाही समावेश असून, १० ते १२ पोलीस गंभीर जखमी झाले आहेत.**

जखमींवर पनवेल येथील एमजीएम रुग्णालयात उपचार सुरू असून, काहींची प्रकृती चिंताजनक आहे. सुदैवाने, कोणताही कैदी जखमी झाला नाही. हा अपघात आणि त्याच रात्री भिवंडी-कल्याण मार्गावर कंटेनर पलटल्याने झालेला दुसरा अपघात यामुळे परिसरात तणावाचे वातावरण आहे.

भातान बोगद्यातील अपघाताचा थरार

मुंबई-पुणे एक्सप्रेसवेवर पुणे लेनवर रात्री उशिरा हा विचित्र अपघात घडला. अपघातात पाच ते सहा पोलिसांच्या पिंजरा गाड्या, एक महामंडळाची बस, एक टेम्पो, एक पोलिस स्कॉर्पिओ आणि एक जीप यांचा समावेश होता. हा ताफा मुंबईहून पुण्याकडे बांगलादेशी कैद्यांना घेऊन जात होता. प्राथमिक माहितीनुसार, वेग आणि नियंत्रण सुटल्याने ही वाहने एकमेकांवर आदळली. यामुळे भातान बोगद्यात गाड्यांचा खच पडला, आणि वाहतूक काही तासांसाठी पूर्णपणे ठप्प झाली.

अपघाताची माहिती मिळताच पोलिस आणि बचाव पथके घटनास्थळी दाखल झाली. जखमी पोलिसांना तातडीने पनवेलच्या एमजीएम रुग्णालयात दाखल करण्यात आले. अपघात अत्यंत भीषण होता. गाड्या एकमेकांवर चढल्या होत्या. आम्ही तात्काळ बचावकार्य सुरू केले आणि रस्ता मोकळा केला, असे एका वरिष्ठ पोलिस अधिकाऱ्याने सांगितले. अपघाताचे नेमके कारण अद्याप स्पष्ट झालेले नसून, पोलिस सीसीटीव्ही फुटेज आणि प्रत्यक्षदर्शींच्या साक्षींच्या आधारे तपास करत आहेत.

**वाहतूक कोंडी आणि प्रशासनाची तत्परता**

या अपघातामुळे मुंबई-पुणे एक्सप्रेसवेवर लांबच लांब वाहनांच्या रांगा लागल्या, आणि प्रवाशांना तासन्तास ताटकळत थांबावे लागले. पोलिसांनी तातडीने बचावकार्य हाती घेत रस्ता मोकळा केला, तरी वाहतूक पूर्णपणे पूर्ववत होण्यास बराच वेळ लागला. अपघातामुळे प्रवाशांचा खोळंबा झाला, पण आम्ही लवकरात लवकर परिस्थिती नियंत्रणात आणली, असे वाहतूक पोलिसांनी सांगितले. या घटनेमुळे एक्सप्रेसवेवर रात्रीच्या वेळी वाहन चालवताना अधिक सावधगिरी बाळगण्याचे आवाहन प्रशासनाने केले आहे.

भिवंडी-कल्याण मार्गावर कंटेनर पलटला, चालकाचा मृत्यू

त्याच रात्री भिवंडी-कल्याण मार्गावर आणखी एक भीषण अपघात घडला. एक कंटेनर रिव्हर्स घेताना मागील बाजू उंच असल्याने कलंडला आणि पलटला, ज्यामुळे चालक राम लखन चव्हाण (वय ४८, शहापूर) यांचा जागीच मृत्यू झाला.हा अपघात भिवंडीकडे येताना घडला, आणि यामुळे या मार्गावरही काही काळ वाहतूक कोंडी निर्माण झाली. शांतीनगर पोलिस आणि वाहतूक पोलिसांनी तातडीने घटनास्थळी धाव घेत मृतदेह ताब्यात घेतला आणि तपास सुरू केला. कंटेनरचा मागील भाग उंच असल्याने तोल जाऊन वाहन पलटले. अपघाताचे नेमके कारण तपासातून स्पष्ट होईल, असे पोलिसांनी सांगितले.

cmyk